आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

डॉ.सौ.प्रियंका सचिन सूर्यवंशी
M.B.B.S, M.D. DERMATOLOGIST, VENEREOLOGIST, LEPROSY (SAFDURJANG DELHI)
श्री सिद्धिविनायक स्कीन क्लिनीक
उपचार सुविधा उपलब्ध
त्वचारोग, गुप्तरोग, कुष्ठरोग, केस, सौदर्य, लेजर उपचार तज्ञ
Treatment Facilities Available
Skin | Nail | Hair
Laser | Cosmetic
पत्ता :- SBI बँक समोर, गोविंदराज कॉम्प्लेक्स, तोष्णीवाल हॉस्पिटलच्या जवळ, राधेश्याम लाहोटी मेडिकल च्या बाजूला, डॉक्टर लेन-2, नांदेड.
अपॉइंटमेंट मोबाईल
8999337277 | 9405672222 | 9850300575

* वर्ष ६५ वे * अंक ६६ * नांदेड * बुधवार, दि. ११ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

घरगुती गॅसला प्राधान्य, नंतर खते, उद्योग आणि व्यावसायिक पुरवठा

गॅस टंचाईवर केंद्र सरकारचा निर्णय

मुंबई (प्रतिनिधी)– आखाती देशांमधील तणावपूर्ण परिस्थिती आणि जागतिक ऊर्जा बाजारातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस टंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत गॅस पुरवठ्याचे नियमन करण्यासाठी गॅझेट आदेश जारी केला आहे. या निर्णयानुसार घरगुती वापरासाठीचा गॅस पुरवठा सुरळीत राहावा यासाठी विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

सरकारने स्पष्ट केले आहे की नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी काही महत्त्वाच्या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात येईल. त्यांना त्यांच्या मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या प्रमाणात गॅस पुरवठा करण्यात येणार असून आवश्यकतेनुसार काही गैर-प्राधान्य क्षेत्रांमध्ये कपात करण्यात येईल.

नैसर्गिक वायूच्या वितरणाचे नियमन करण्यासाठी हा आदेश आवश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ३ अंतर्गत जारी करण्यात आला आहे. या आदेशानुसार गॅस पुरवठा प्राधान्याने कोणत्या क्षेत्रांना दिला जाईल यासाठी चार स्वतंत्र श्रेणी निश्चित करण्यात आल्या आहेत.

प्राधान्य श्रेणी १ मध्ये घरगुती पाइप्ड नॅचरल गॅस, वाहतुकीसाठी वापरला जाणारा कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस, एलपीजी उत्पादन आणि पाइपलाइन ऑपरेशनसाठी आवश्यक गॅस यांचा समावेश करण्यात आला आहे. या क्षेत्रांना मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या १०० टक्के गॅस पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र हा पुरवठा उपलब्धतेवर अवलंबून असेल.

प्राधान्य श्रेणी २ मध्ये खत उत्पादन करणाऱ्या कारखान्यांचा समावेश आहे. या उद्योगांना मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या किमान ७० टक्के गॅस पुरवठा केला जाणार आहे. मात्र हा गॅस केवळ खत निर्मितीसाठीच वापरला जाईल. संबंधित कंपन्यांना याबाबतचे प्रमाणपत्र (पीपीएसी) कडे सादर करावे लागेल.

प्राधान्य श्रेणी ३ मध्ये चहा उत्पादन उद्योग आणि राष्ट्रीय गॅस ग्रीडशी जोडलेले इतर औद्योगिक ग्राहक यांचा समावेश आहे. या उद्योगांना त्यांच्या मागील सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या सुमारे ८० टक्के गॅस पुरवठा केला जाणार आहे.

प्राधान्य श्रेणी ४ अंतर्गत सिटी गॅस डिस्ट्रीब्युशन (सीजीडी) नेटवर्कद्वारे गॅस घेणारे औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहक यांना त्यांच्या सरासरी वापराच्या सुमारे ८० टक्के गॅस उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

देशात एस्मा कायदा लागू

केंद्र सरकारचा मोठा निर्णय

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– मध्य आशियातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम भारताच्या इंधन पुरवठ्यावर होऊ नये, यासाठी केंद्र सरकारने आजपासून संपूर्ण देशात 'अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा' म्हणजेच 'एस्मा' लागू केला आहे. एलपीजी सिलिंडर आणि पेट्रोलियम उत्पादनांची संभाव्य टंचाई रोखण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले असून, पुढील आदेशापर्यंत इंधन क्षेत्रातील सर्व सेवा अत्यावश्यक श्रेणीत राहतील.

मध्य आशियात सुरू असलेल्या तणावामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत देशांतर्गत बाजारपेठेत इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि उपलब्ध साठ्याचे वितरण समान पद्धतीने व्हावे, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. 'एस्मा' लागू झाल्यामुळे आता इंधन पुरवठा साखळीतील कोणताही कर्मचारी किंवा संघटना संप करू शकणार नाही अथवा आंदोलनाचे हत्यार उपसू शकणार नाही. कामावर येण्यास नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर या कायद्यांतर्गत थेट कठोर कारवाई किंवा अटकेची तरतूद करण्यात आली आहे.

युद्धाच्या सावटाखाली जेव्हा एखाद्या वस्तूचा पुरवठा विस्कळीत होतो, तेव्हा बाजारात साठेबाजी आणि काळाबाजार वाढण्याची दाट शक्यता असते. हे रोखण्यासाठी सरकारला या कायद्यामुळे विशेष अधिकार प्राप्त झाले आहेत. आता व्यापारी किंवा गॅस विक्रेते अधिक नफा मिळवण्याच्या उद्देशाने एलपीजी सिलिंडरचा साठा करून ठेवू शकणार नाहीत. जर कोणीही अशा प्रकारे साठेबाजी करताना आढळल्यास, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय, टंचाईच्या काळात ग्राहकांची आर्थिक लूट टाळण्यासाठी सरकार जीवनावश्यक वस्तूंची कमाल विक्री किंमत निश्चित करू शकते.

सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी सरकारने तेल कंपन्यांना विशेष सूचना दिल्या आहेत. इतर पेट्रोलियम उत्पादनांचे प्रमाण तात्पुरते कमी करून केवळ एलपीजी उत्पादनावर जास्तीत जास्त भर देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे रुग्णालये, हॉटेल उद्योग आणि प्रामुख्याने घरगुती वापरासाठी लागणारा गॅस वेळेवर उपलब्ध होण्यास मदत होईल. इंधन पुरवठा विस्कळीत होणार नाही याची खात्री या निर्णयामुळे सरकारला करता येणार आहे.

दरम्यान, नागरिकांनी इंधन टंचाईच्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अफवा पसरवून गोंधळ निर्माण करणाऱ्यांवर आणि साठेबाजी करणाऱ्यांवर सरकारची करडी नजर असणार आहे. देशातील एलपीजी वितरण, पेट्रोल पंप आणि तेल कंपन्यांचे कामकाज पूर्ण क्षमतेने सुरू राहावे, यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

आयसीसी आणि बीसीसीआयकडून भारतीय खेळाडूंसाठी बक्षिसांची मेजवानी

अहमदाबाद (प्रतिनिधी) – टी २० विश्वचषक जिंकल्यानंतर टीम इंडियातील प्रत्येक खेळाडूला सुमारे ६ ते ७ कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे संघात आनंदाचे वातावरण असून कर्णधार सूर्यासह संजू सॅमसन यालाही समान बक्षीस मिळणार आहे.

नरेंद्र मोदी स्टेडियम येथे रंगलेल्या आयसीसी टी-२० वर्ल्डकपच्या च्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडवर दणदणीत विजय मिळवला. सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने तब्बल ९६ धावांनी विजय मिळवत विश्वचषकावर पुन्हा एकदा आपले नाव कोरले. या विजयासह भारताने सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला. या ऐतिहासिक यशानंतर बीसीसीआयने टीम इंडियासाठी १३१ कोटी रुपयांच्या रोख बक्षिसाची घोषणा केली आहे. बीसीसीआयचे सचिव देवाजीत सैकिया यांनी ही घोषणा केली.

यापूर्वी रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्या वेळी बीसीसीआयने १२५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. यंदा त्यापेक्षा ६ कोटी रुपये अधिक देण्यात आले आहेत.

अहमदाबादमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा पराभव करून भारताने प्रतिष्ठेची ट्रॉफी जिंकली. या विजयासह टी-२० विश्वचषक कायम राखणारा स्पर्धेच्या इतिहासातील पहिला संघ बनण्याचा मान भारताला मिळाला.

इतकेच नव्हे तर भारत आता तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा पहिला संघ ठरला असून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपली ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

नांदेडमध्ये १३ ते १८ मार्च कालावधीत मिनी सरस रेणुका महोत्सवाचे आयोजन

- महिला बचत गटांच्या उत्पादनांचे भव्य प्रदर्शन व विक्री
- मेळाव्यात सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवाणी

नांदेड (प्रतिनिधी)– उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा परिषद नांदेड यांच्यावतीने रेणुका महोत्सव २०२६ निमित्त 'मिनी सरस'प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा नांदेड येथील मल्टीपर्पज हायस्कूल, वजीराबाद येथे १३ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत भरविण्यात येणार आहे.

या मिनी सरस मेळाव्यात महाराष्ट्रातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध दर्जे दार वस्तू व खाद्यपदार्थांचे भव्य प्रदर्शन व विक्री होणार आहे. यामध्ये बाजरीची खारोडी, व्हेज आम्लेट, अमरावतीची मांड्यावर मडक्यात तयार केलेली पुरणपोळी, बाजरीची भाकरी-बेसन-ठेचा, काजू, मँगो पल्प, पापड, कुरडई, विविध प्रकारची लोणची, मसाले, शेवया, नाचणीचे पदार्थ, डाळी, मनुका आदी खाद्यपदार्थांचा समावेश आहे.

तसेच घोंगडी, बंजारा ड्रेस, कोल्हापुरी चप्पल, पुरुषांचे कपडे, साड्या, खेळणी, घर सजावटीच्या वस्तू, बांबूच्या वस्तू, सौंदर्य प्रसाधने, बेन्टेक्स दागिने, हस्तनिर्मित वस्तू, जयपुरी टोपी, लाकडी वस्तू, भांडी अशा विविध प्रकारच्या वस्तूही विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत.

मेळाव्यात दररोज संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून नांदेडकरांना सांस्कृतिक मेजवानीचा आनंदही घेता येणार आहे. दर्जेदार साहित्य व माफक दरात उपलब्ध असलेल्या या मेळाव्याला भेट देऊन महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक मेघना कावली तसेच उमेद जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ संजय तुबाकले व जिल्हा प्रशासन नांदेड यांच्यावतीने करण्यात आले आहे. नांदेड शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

राज्यात २०० 'खासगी भूमापकांची' नियुक्ती

आता महिनाभरात होणार जमीन मोजणी

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी आणि नागरिकांना जलद सेवा देण्यासाठी महसूल विभागाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. आता शासकीय मोजणी कामी 'खासगी परवानाधारक भूमापकांची' नियुक्ती करण्यात आली असून, ३० मार्च २०२६ पासून हे भूमापक प्रत्यक्ष मैदानात उतरणार आहेत, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत दिली. यामुळे मोजणीची प्रक्रिया आता केवळ १५ ते ३० दिवसांत पूर्ण होणार आहे.

राज्यात सध्या पोट-हिस्सा, हद्दकायम, बिनशेती आणि गुंठेवारीसारख्या मोजणी प्रकरणांचा निपटारा मनुष्यबळाअभावी रखडला होता. यावर उपाय म्हणून शासनाने २०० परवानाधारक भूमापकांना दोन खासगी अभिकरणांमार्फत कार्यारंभ आदेश दिले आहेत. हे भूमापक दोन आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण पूर्ण करून कामावर रुजू होतील.

चर्चेदरम्यान माजी मंत्री जयंत पाटील यांनी एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे सरकारचे लक्ष वेधले. त्यावर उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, जयंत पाटील यांची सूचना अत्यंत रास्त आहे. अडीच एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या अल्पभूधारकांसाठी मोजणी शुल्काबाबत शासन वेगळा आणि सहानुभूतीपूर्वक विचार करत आहे.

राज्यातील ज्या १७-१८ तालुक्यांमध्ये मोजणीची प्रकरणे सर्वाधिक प्रलंबित आहेत, तिथे 'पायलट प्रोजेक्ट' राबवण्यात येणार आहे. प्रत्येक महसूल विभागातील ३ तालुके याप्रमाणे एकूण १८ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. येथे खाजगी भूमापक आणि शासकीय अधिकारी यांची संयुक्त टीम काम करेल. मोजणीचे नकाशे, पंचनामे आणि अक्षांश-रेखांश तपशील थेट प्रणालीवर अपलोड होतील. मोजणीचे प्रमाणीकरण उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फतच होईल. कामात दोष आढळल्यास खाजगी भूमापकावर दंडात्मक आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. शासकीय जमिनींवरील अतिक्रमण, एकत्रीकरण किंवा पुनर्मोजणीचे काम मात्र खाजगी भूमापकांना करता येणार नाही.

जिष्णू देव वर्मा यांनी घेतली राज्यपालपदाची शपथ

मुंबई (प्रतिनिधी)– महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्यपाल पदाची शपथ घेतली. लोकभवनातील दरबार सभागृह येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपालपदाची शपथ दिली.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. जिष्णू देव वर्मा हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत.

सुरुवातीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी जिष्णू देव वर्मा यांच्या नियुक्तीसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली. शपथविधी नंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली.

शपथविधी सोहळ्याला विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, अन्न व औषध प्रशासन नरहरी झिरवळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भारती, मुख्य राज्य शिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



टेंभुर्णीतील संदल यात्रेत किरकोळ वादातून तरुणाचा खून; दोन भावांना अटक

नायगाव बाजार (प्रतिनिधी)– नायगाव तालुक्यातील टेंभुर्णी येथे शहावली दर्ग्याच्या संदल यात्रेदरम्यान झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर थेट खुनात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संतोष उर्फ गणेश किशनराव वडजे (वय २९) या तरुणाचा दगडाने ठेचून खून करण्यात आला आहे. या प्रकरणी नायगाव पोलिसांनी तातडीने कारवाई करत पप्पू उर्फ जेजेराव सटवा सुताडे व श्याम सटवा सुताडे या दोन भावांना अटक केली आहे.

टेंभुर्णी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही शहावली दर्ग्याची संदल यात्रा उत्साहात सुरू होती. यात्रेनिमित्त गावात भाविकांची मोठी गर्दी होती. सोमवार, दि. १० मार्च रोजी मध्यरात्री सुमारे दोनच्या सुमारास यात्रेच्या परिसरात संतोष वडजे याचा गावातील पप्पू उर्फ जेजेराव सटवा सुताडे (वय ३२) व त्याचा भाऊ श्याम सुताडे यांच्याशी किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाने काही वेळातच उग्र रूप धारण केले. उपस्थित नागरिकांनी तातडीने मध्यस्थी करत वाद मिटवण्याचा प्रयत्न केला व संतोष वडजे याला घरी पाठवले.

मात्र काही वेळाने संतोष वडजे पुन्हा घराबाहेर पडला. त्यावेळी आरोपी दोघा भावांनी त्याला अडवून पुन्हा वाद घालत मारहाण केली. या झटापटीदरम्यान आरोपींनी मोठा दगड उचलून संतोषच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. या गंभीर मारहाणीमुळे संतोष वडजे जागीच कोसळला. डोक्यावर गंभीर दुखापत झाल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

मंगळवारी सकाळी गावकऱ्यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर संतोष वडजे याचा मृतदेह रस्त्याच्या कडेला आढळून आला. घटनेची माहिती वाऱ्यासारखी गावभर पसरताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच नायगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नायगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवला.

या प्रकरणी मयताचे वडील किशन आबाजी वडजे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पप्पू उर्फ जेजेराव सटवा सुताडे व श्याम सुताडे या दोघांविरुद्ध नायगाव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तत्पर कारवाई करत दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

दरम्यान, बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानगेवकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एन. जी. पोमनाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून गावात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यात्रेच्या आनंदमय वातावरणावर या घटनेमुळे शोककळा पसरली आहे.

युद्धामुळे गॅसनंतर आता सोन्याच्या भावातही उसळी

मुंबई (प्रतिनिधी)– जागतिक राजकारणातील तणाव आणि इराण इस्त्रायल युद्धजन्य परिस्थितीचा थेट फटका जन सामान्यांना बसत आहे. मौल्यवान धातुंसह गॅसच्या दरातही वाढ झाली आहे. जागतिक पातळीवर सुरु असलेल्या युद्धजन्य स्थितीचा थेट फटका सामान्यांच्या खिशाला बसत आहे. सोन्यासह चांदीच्या दराने उच्चांक गाठला आहे. जागतिक तसेच भारतीय बाजारपेठेत सोन्याच्या दराने चांगलीच उसळी घेतली आहे.

मंगळवारी प्रति तोळा सोनं १ लाख ६५ हजार २४९ रुपयांनी विकला जात आहे. मुंबईत १० ग्रॅम सोन्याचा दर १ लाख ६४ हजार ३५५ रुपये इतका होता. सोमवारच्या तुलनेत मंगळवारी सोन्याच्या दराने उसंडी घेतली आहे. सोमवारच्या तुलनेत मंगळवारी सोन्याच्या दरात ९०० रुपयांनी वाढ झाली आहे.

दरम्यान, सोन्यासह चांदीच्या दरातही वाढ झाली आहे. चांदीची चमक काही कमी होत नसल्याचं पाहायला मिळत आहे. प्रति किलो चांदी २ लाख ८१ हजार १४ रुपयांनी सराफाच्या बाजारात विकली जात आहे. सोन्यासह चांदीच्याही दरात चकाकी पाहायला मिळत आहे. सोनं महागल्यामुळे काही ग्राहक चांदीकडे वळतात. मात्र, सोनं आणि चांदीच्या दरात होणारी वाढ पाहून ग्राहक चिंतेत पडले आहेत.

गुड रिटर्न्स या वेबसाईटनुसार, भारतात मंगळवारी २४ कॅरेट १ तोळं सोन्याच्या दरात ७०० रुपयांची वाढ झाली आहे. १० ग्रॅम सोनं खरेदीसाठी आपल्याला १,६२,३८० रुपये मोजावे लागतील. तर, २४ कॅरेट १० तोळं सोन्याच्या दरामागे ७००० रुपयांची वाढ झाली आहे. १०० ग्रॅम सोनं खरेदीसाठी आपल्याला १६,२३,८०० रुपये मोजावे लागतील.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

शाळेमध्ये सुद्धा मुली असुरक्षित?

जागतिक महिला दिन शासकीय पातळीवर मोठा गाजावाजा करून साजरा केला जातो. परंतु दुसरीकडे आज देखील बहुतांश शाळांमध्ये मुली असुरक्षित आहेत. भारतीय समाजात शिक्षणाला मंदिराचे स्थान दिले जाते. शाळा म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे पवित्र स्थान मानले जाते. विशेषतः मुलींसाठी शिक्षण हे स्वावलंबन आणि सन्मानाचे दार उघडणारे साधन आहे. मात्र अलीकडील घडामोडी आणि उपलब्ध आकडेवारी पाहिली तर या मंदिरातच सावित्रीच्या लेकी सुरक्षित आहेत का, असा प्रश्न निर्माण होतो. नांदेड जिल्ह्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याची धक्कादायक वस्तुस्थिती समोर आली असून, मुलींच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. राज्य सरकारने विधान परिषदेत दिलेल्या माहितीनुसार राज्यातील तब्बल ६५ हजारांहून अधिक शाळांमध्ये अद्याप सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले नाहीत. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. नांदेड जिल्ह्यातही परिस्थिती फारशी वेगळी नाही. जिल्ह्यातील एकूण ३,७०४ शाळांपैकी केवळ १,१६० शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत. उर्वरित २,५४४ शाळा अजूनही 'तिसऱ्या डोळ्या'च्या संरक्षणापासून वंचित आहेत. म्हणजेच अडीच हजारांहून अधिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या, विशेषतः मुलींच्या सुरक्षेची कोणतीही प्रभावी यंत्रणा नाही, हे वास्तव पालकांच्या चिंतेत भर टाकणारे आहे. शाळा ही केवळ शिक्षण देण्याची संस्था नसून ती विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचीही हमी देणारी जागा असते. मुली शाळेत सुरक्षित असतील, अशी पालकांची नैसर्गिक अपेक्षा असते. परंतु अलीकडील काही अत्याचारांच्या घटना समाजाला हादरवून सोडणाऱ्या ठरल्या आहेत. अशा घटनांनंतर प्रशासनाने सुरक्षा उपाययोजनांबाबत अधिक सजग राहणे अपेक्षित होते. परंतु वास्तवात मात्र सरकारी आदेश असूनही त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. शासनाने २१ ऑगस्ट २०२४ रोजीच शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले होते. तरीही दोन वर्षांच्या कालावधीनंतरही ही प्रक्रिया पूर्ण न होणे हे प्रशासनातील दिरंगाई आणि उदासीनतेचे उदाहरण ठरते. सीसीटीव्ही कॅमेरे हे केवळ गुन्हा घडल्यानंतर पुरावा मिळवण्यासाठी नसतात, तर ते गुन्हे घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून महत्त्वाचे असतात. शाळांमध्ये कॅमेरे असतील तर शिक्षक, कर्मचारी, बाहेरून येणारे लोक यांच्यावर एक प्रकारची नजर ठेवली जाते. त्यामुळे कोणत्याही गैरप्रकाराला आळा बसण्यास मदत होते. शिवाय विद्यार्थ्यांमध्येही शिस्त राखण्यास मदत होते. त्यामुळे शाळांमध्ये 'तिसरा डोळा' असणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. मात्र केवळ सीसीटीव्ही बसवणे हेच अंतिम समाधान नाही. मुलींच्या सुरक्षिततेसाठी व्यापक उपाययोजना करण्याची गरज आहे. सर्वप्रथम प्रत्येक शाळेत सुरक्षित आणि स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था असणे अत्यावश्यक आहे. अनेक ग्रामीण भागात मुलींसाठी स्वतंत्र सुविधा नसल्यामुळे त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. एवढेच नव्हे तर शहरातील बड्या व्यक्तींच्या शाळांमध्ये देखील हीच दुरावस्था आहे. दुसरे म्हणजे शाळांमध्ये महिला शिक्षक आणि महिला कर्मचारी यांची संख्या वाढवणे आवश्यक आहे. मुलींना समस्या किंवा तक्रार असल्यास त्या महिलांकडे सहजपणे व्यक्त होऊ शकतात. तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शाळांमध्ये नियमित सुरक्षा तपासणी आणि देखरेख व्यवस्था निर्माण करणे. शाळेच्या परिसरात अनोळखी व्यक्तींना प्रवेश देताना कडक नियम असावेत. प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक असणे, भेट देणाऱ्यांची नोंद ठेवणे यासारख्या उपाययोजना केल्यास धोका कमी होऊ शकतो. याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण, लैंगिक अत्याचारांविषयी जागरूकता, हेल्पलाईन क्रमांकांची माहिती अशा कार्यक्रमांचे आयोजन शाळांनी नियमितपणे करणे आवश्यक आहे. शिक्षकांनाही विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि सामाजिक सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. पालकांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची आहे. पालकांनी मुलांशी मोकळेपणाने संवाद साधून त्यांच्या समस्या ऐकून घ्याव्यात. शाळेत काही गैरप्रकार जाणवले तर तत्काळ शाळा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांना माहिती देणे आवश्यक आहे. समाज, शाळा आणि प्रशासन या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे काम केल्यासच मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण होऊ शकते. नांदेडसारख्या जिल्ह्यात शिक्षणाचे मोठे जाळे पसरलेले आहे. हजारो विद्यार्थी रोज शाळेत जातात. त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ कागदोपत्री आदेशांवर सोडून चालणार नाही. जिल्हा नियोजनाच्या पाच टक्के निधीतून सीसीटीव्ही बसवण्याचे निर्देश असताना ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची गरज आहे. प्रशासनाने यासाठी ठोस वेळापत्रक जाहीर करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी मोठा संघर्ष केला. आज त्या सावित्रीच्या लेकी शाळेत जात असताना त्यांच्या सुरक्षिततेची चिंता पालकांना वाटू लागली, ही समाजासाठी लाजिरवाणी बाब आहे. शिक्षणाच्या मंदिरात भीतीचे सावट राहू नये, यासाठी शासन, प्रशासन आणि समाजाने तत्काळ पावले उचलली पाहिजेत. शाळांमध्ये 'तिसरा डोळा' जागा होण्याची वाट पाहण्यापेक्षा तो तातडीने उघडणे ही काळाची गरज आहे. कारण सुरक्षित शाळाच सुरक्षित भविष्य घडवू शकतात.

विनोदाने अहंकार व विकृतीचा नाश व्हावा!

कधीकधी वाटतं काहीतरी वाटावं. कधीकधी वाटतं काहीचं वाटू नये. पण वाटणं गरजेचं होतं.

त्यामुळं मिक्सरमधूनच वाटलं.

कोण्या एका नवोदित कवयित्रीला ही छानं कविता सूचल्याचं गुरुवर्य बी. वाय. कुलकर्णी सरांनी त्यांच्या व्याख्यानात सांगीतलं होतं.त्यामुळंचआपल्या मनास काय वाटतं आणि काय वाटतं नाही याला महत्व नसतं.परिस्थितीशी तडजोड साधूनं जे करणं गरजेच असतं.शक्य असतं आणि वेळ निभाऊन नेली जाते. त्यालाचं मानवी जीवन म्हणतातं.त्यामुळं असाअ-नेक पदार्थाचा कच्चा मालं मिक्सरमधून काढला जातो, त्या प्रतिकूल परिस्थितीतं. आपला आहार विहार, आरोग्य चांगले ठेवणे गरजेचे असते.आपले आरोग्य उत्तम असेलं तर आपणास मिळण-ारा आनंद काही पटीने वाढत जातो. प्रकृती उत्तम ठेवण्यासाठी फारं पैशाची गरज नसते.प्रकृती बिघडविण्साठी मात्र खूप पैसे खर्च करावे लागतात.ती गरज कधीच संपणारी नसते.न संपणारी गरज पूर्ण करण्याच्या मागे माणूस लागला की गरजेचे अनेकवचन गरजा केंव्हा झाले तेच कळत नाही.

या सर्व वास्तव परिस्थितीवर आमच्या एका अनौपचारिक कविसंमेलनात आमचा मित्र पक्यानं एक मुक्तछंदातील ही कविता सादर केली होती. प्रकृती बिघडविण्यासाठी ढाब्यावर जावं लागतं. अनेक समविचारी तळीराम जमवावे लागतात. आपल्या हितचिंतकांच्या नजरा चुकवाव्या लागतात. घरातं खोटं बोलावं लागतं. शहराबाहेर जाऊन सुरक्षित जागा शोधावी लागते. मंदमंद प्रकाशात निवांत बसावं लागतं. एकेकं ऑर्डर शांतपणे द्यावी लागते. एकेक पॅग रिचवावा लागतो. स्नॅक्सच्या नावाने कचरा पोटात घालावा लागतो. बेधुंद होताच जेवण नावाचा कडबा खावा लागतो. घरी जातांना एकमेकांस सांभाळून न्याव लागतं. अर्थात स्वत:शुद्धीवर असालं तरच. नसता कोणी मधेच गेलं तर ' तो मी नव्हेच' प्रमाणे ' ' तिथे मी नव्हत-ोच 'असा पवित्रा घ्यावा लागतो. मशिन बिघडल्यावर दवाखाना गाठावा लागतो. एकसारखे डॉक्टर बदलावे लागतातं. एकेक अवयव निकामी कसा झाला ? हे लोकांना सांगूण सहानुभूती मिळवावी लागते. आणि एक दिवसं अल्पवयातच, जगाला रामराम ठोकावा लागतो. शेवटी कुटुंबाचा उन्हाळा करावा लागतो. आप्तेष्ठ,शेजाऱ्यांना त्यांची समज काढावी लागते. बरं झालं लवकर गेला,आणखी तुमचा किती,कसा उन्हाळा केला असता? सांगता आलं नसतं. याप्रमाने तळीराम कार्य पूर्ण करावे लागते. असा सर्वनाश करुन घेण्यास खूप पैसा खर्च करावा लागतो,बरबाद व्हावं लागतं. मुलाबाळांना भिकेला लावावं लागतं. प्रकृती बिघडविण्यासाठी यापेक्षाही खूप काही करावं लागतं.मित्रहो खूप काही करावं लागतं. मात्र प्रकृती चांगली ठेवण्यासाठी फारसा पैसा खर्च करावा लागत नाही. ही कविता आमचा मित्र पक्याने आमच्यासमोर सादर केली. आम्ही सर्वांनी भरपूर हसून व टाळ्या वाजवून पक्याला दाद दिली व कवितेचा मनमुराद आनंद घेतला.पक्याच्या चेहरा पण गुलाबासारखा टवटवीत फुलला.

एवढ्यात मक्या नावाचा आमचा मित्र उठला आणि म्हणाला,ऑब्जेक्शन ऑल फ्रेंड्स,ही कविता धादांत खोटी आहे,कपोलकल्पित,काल्पनिक आहे. मक्याला एवढे उत्तम शब्द कसे आठवत होते,तेच आम्हाला कळतं नव्हतं.कदाचित पक्याच्या कवितेचा परिणाम झाला असावाआणि त्याला खोडून काढण्या साठी मक्याची प्रतिभा नावाची ट्यूब अशी धडाडून पेटली असावी.पुढे मक्या त्याची बाजू प्रचंड आत्म विश्वासाने मांडू लागला,मला एक गोष्ट सांगा. योगा- चार्य रामास्वामी अय्यंगार ९६ वर्ष जगले आणि वादग्रस्त पत्रकार खुशवंतसिंग किती जगले? मुक्त, व्यसनी वअय्याशी जीवन जगून.आमच्यापैकी एकाने तात्काळ उत्तर दिले,१०० वर्षे. मक्याचा आनंद गगनात मावत नव्हता.तो पुढे लगेच म्हणाला, म्हणजेच त्यांच्या मुक्त जीवनाचा त्यांना फायदा झाला का तोटा? मग मला सांगा,लोक मनसोक्त वागणे खाणेपिणे ऐश करणे अशा पवित्र गोष्टीला बदनाम का करतात?त्यात हा पक्या अशी फर्राटे- बाज कविता करुन आमच्यासारख्या मनमौजी माणसांना बदनाम करतो?आमच्या दोघातला एक खाजगी किस्सा मुद्दामच मला या ठिकाणी सांगायचा आहे. एकदा या बहादरानं मला घरी जेवायला बोलावलं.वहिणीनं स्वयंपाक अतिशय उत्तम केला होता.त्या माऊलीचे आभार मी अगोदर मानतो.यानं घरी गेल्यावर फ्रिज मधून खंबा काढला 'जॉनी वॉकर ' मी म्हणालो पक्या एवढ्या महागाची पितो. तर म्हणतो कसा,आन् मंग,आपलं कामच असं आहे. ऐश करायची तर भरभरुन,नाही तर तीचं नावचं घ्यायच नाही.पक्याची ठसनबाज गोष्ट ऐकून थोडा वेळ माझाही उर अभिमानानं भरुन आला.मी त्याला म्हणालोही,दोस्त हो तो ऐसा ! मी तसा पट्टीचा पिणारा मला जाणवायला लागलं ही तर देशीची चवं. पक्याचा हा बेरकीपणा पाहून मी एकदम चक्राऊन गेलो.'ओल्ड वाईन एड न्यू बॉटल ' चा अर्थ मला चांगलाच कळू लागला.आन् आज इथं अशी कविता म्हणून आपण निर्व्यसनी असल्याचा आवं आणतोय. त्यामुळं हा त्याचा प्रयत्न अतिशय नाटकी व ढोंगी आहे.हे तुम्हाला आवर्जुन सांगीतलंच पाहिजे.मध्ये एकही पॉज नघेता मक्यांन स्वानुभव सर्वासमोर सांगीतला.

पक्याचा चेहरा पहाण्यासारखा झाला.खोटं बोलल्यामुळं त्याचा मेंदू ना-वाचा मोबाईलं हँग झाला होता.आपण इतरांना फसवलं याचा आनंद क्षणिक असतो.त्यामुळं समस्याची सुरुवात होते.समस्याचा गुणाकार होतो.सुखाला विरुद्धार्थी शब्द दु:ख आहे. आनंदाला विरुद्धार्थी शब्द नाही.तो पैशाने विकत घेता येत नाही.तो आपल्या मनोवृत्तीवर अवलंबून असतो.आपली मनोवृती इतरांची फसगत करणारी, जाणिवपूर्वक फसवणूक करणारी असेलं तर आपण सुसंस्कृत आनंद घेवू शकत नाही.विकृत आनंद ही मानवी वृत्ती नसून तिचा संबध राक्षसी वृत्तीशी आहे. विनोद माणसाला सुसंस्कृत आनंदाकडे घेवून जातो. तो मानवी जीवनाची उत्तुंग दिशा दाखवतो. काही लोकांना आपल्या ज्ञानाचा अहंकार होतो.त्यांचा विनोदाशी फारसा संबध नसतो असे दिसून येते.

सत्य आणि स्पष्ट बोलण्याच्या नावाखाली आपण इतरांचा अपमान करण्याचे लायसन काढले आहे. असे समजणारे अनेक लोक असतातं. मक्या पण त्यापैकी एक आणि पक्याच्या मनोवृतीतही फारसा फरक नाही. इतरांचा पानउतारा करणे समोरच्याला कमी लेखणे हा त्यांचा आवडता छंद होता.समोरचा माणूस अपमानास्पद वागणूकीने अतिशय निराश, उदास,हताश,उद्विग्न झाला म्हणजे मी फार सत्य बोललो त्यामुळे तो आपल्यासमोर ब्र काढू शकला नाही. त्याचा लाईट कसा डिम झाला.त्याची बोलती कशी बंद झाली.हा त्यांच्या आनंदाचा विषय असल्या मुळे माझे वाचन,ज्ञान,माहिती अफाट असल्यामुळे माझ्यासमोर इतर लोक बोलू शकत नाहीतं.त्यांना मी निशब्द करतो हे माझे कौशल्य आहे.अशी शेखी मिरवणाऱ्या पक्यामक्याला एकेक मित्र आपल्या पासून दुर कसा गेला ते समजलंच नाही.त्यांना इगो कैफ इतका काही चढला होता.माझे कोणावाचून काहीच अडत नाही.ही घमेंडखोर वृत्ती त्यांच्या शब्दा शब्दा-तून जाणवत असे.माणसातील हे स्व-चेअस्तित्व म्हणजे स्वाभिमान आहे.असं समजणारे पक्यामक्या अंहकाराचा एवरेस्ट कधी झाले त्याचं त्यांना सुद्धा कळालं नाही.साहित्यक्षेत्रातील त्यांचाअनुभव लक्षात घेवून,त्याचे ज्ञानानुभवाची दखल घेवून प्रत्येक नवोदित त्यांचा सन्मान करायचा पण हे स्वंयघोषित विद्वान कधी स्पष्ट बोलण्याचे तर कधी नको तो वाद घालण्याचा अविचार करतीलं हे सांगता येतं नव्हतं. समोरच्या व्यक्तीचे खच्चीकरण करणे त्यांच्यासाठी आनंदपर्वणी होती.त्यामुळे यांना सन्मान देणे हे काम अतिशय कठीण झाले होते. पक्याच्या घरचा देशी आनुभव त्या कवी संमेलनात सांगण्याची काही गरज होती का? दोघातला किस्सा त्यांच्यापुरताच सिमित ठेवला असता तर बरे झाले असते.एकत्र आलेल्या सर्वांना तो सांगुण आपले विरोधक आपण कसे निर्माण करतो?याचा वस्तूपाठच मक्यानं दिला. मक्याच्या दृष्टीने मात्र तसे करण्यातच खरा पुरुषार्थ होता आणि पक्याला इतरांशी बनवाबनवी करुन तात्कालिक आनंद घेणे हेच तेचे अवतारकार्य.

त्यांच्या अंहकारी व मनोविकृत प्रवृतीचा नावलौकिक त्यांच्या साहित्याबरोबर सर्वत्र पसरत चालला होता.त्यामुळं प्रत्येक माणूस त्यांच्याशी खूप सावध वागतं होता.त्यांचे हे सावध वागणे,यांच्या वृती व दर्पोक्तीला उत्तर होते.पक्याचा खोटरडेपणा जेवढा वाईट त्यापेक्षाही मक्याची अहंदर्पोक्ती वाईट. ज्ञानाने माणूस संयमी,शांत,सुस्वभावी व्हावा. तो खोटारडा व अहंकारी होतं असेल तर ते ज्ञान कवडी मोल ठरते. एवढा साधा शिष्टाचार या दोघांनाही कळू नाही. हे केवढे मोठे दुर्दैव. असे प्रज्ञावंत,प्रतिभासंपन्न इतरांच्या विनोदाचे,अवहेलनेचे,उपेक्षेचे धनी होतात. हे पक्यामक्याला त्यांच्याअनेक हीतचिंतकांनी परो परीने समजावून सांगीतले.त्याचे दुष्परीणाम लक्षात आणून दिले,पण यांच्या शेपट्या काही केल्या सरळ झाल्या नाहीत.यांची कोंबडी सदैव एकाच पायावर उभी असल्यामुळे एकेक माणूस यांच्यापासून दुर निघून गेला.यांचे अहंकारी फुगे मात्र फुगतच चालले होते.एके दिवसी ते फटकन फुटले कोपऱ्यात फुटके रबराचे तुकडे होऊन. त्यानंतर त्यांना स्वअस्तित्व शोधणे शक्य नव्हते.यावर मला एक शेर आठवतो. अंहकार का बोझ इतना बडा होता है । ओ अहंकारी आदमीकोही दफना देता है ।।

–प्रा वसंत गिरी
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

मानसिक आरोग्याच्या समस्या: व्यसनाचे मूळ कारण

तरुणांमध्ये वाढत्या अंमली पदार्थांच्या व्यसनाबद्दल अनेक दिवसांपासून चिंता व्यक्त केली जात आहे. याला आळा घालण्यासाठी कडक कायदे आहेत. अंमली पदार्थ विरोधी पथके सक्रिय दिसतात, तरीही त्यांची उपलब्धता कमी होताना दिसत नाही किंवा सेवन करणाऱ्यांची संख्याही कमी होत नाही. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासात अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे की, १० ते १७ वयोगटातील किशोरवयीन मुले पुढील दशकात मोठ्या प्रमाणात ड्रग्सच्या आहारी जाऊ शकतात.

मानसिक आरोग्याच्या समस्या, कामाचा ताण, वाढती बेरोजगारी आणि बदलती सामाजिक-आर्थिक परिस्थिती यांचा या गटावर सर्वाधिक परिणाम होतो. यामुळे ते सहजपणे नशेच्या प्रभावाखाली येतात. या अभ्यासानुसार ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात अमली पदार्थांच्या व्यसनाची व्याप्ती वाढणार आहे. भारत हा तरुणांचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असल्याने हे संशोधन अधिक चिंताजनक आहे. यावर मात करण्यासाठी संशोधकांनी काही उपाय सुचवले आहेत, ज्यामध्ये पालक आणि सामाजिक संस्थांची जबाबदारी अधोरेखित करण्यात आली आहे. परंतु ज्या पद्धतीने अंमली पदार्थांचा व्यवसाय वेगाने फोफावत आहे, त्यामुळे या संस्था अनेकदा हतबल झाल्याचे दिसून येते.



आजूबाजूला असलेल्या समाजातील लोक, चित्रपटातील नायक, वरिष्ठ, त्यांच्या कुटुंबातील सदस्य इत्यादीचे व्यसन पाहून अनेकजण पौगंडावस्थेत ड्रग्जकडे आकर्षित होतात हे वास्तव आहे. मग कंटाळा, चिडचिड, रिकामेपणा, अभ्यास आणि कामाच्या दबावाखाली या पदार्थांचे सेवन वाढते. आता महानगरांपासून लहान शहरांपर्यंत बेकायदेशीर अवैध मादक पदार्थांची उपलब्धता सातत्याने वाढत आहे. ही काही लपून राहिलेली गोष्ट नाही आणि अनेक प्रकारची नाशिले पदार्थ बाजारात सहज उपलब्ध आहेत की त्यामुळे आताच्या घडीला अनेक किशोरवयीन, तरुणांना ती एक सर्रास वापरणारी वस्तू वाटू लागली आहे. असे नशिल्या पदार्थांचे पालक, शिक्षक, नातेवाईक, परिचित यांच्यापासून लपून, छुप्या पद्धतीने सेवन केली जातात, त्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवणे कठीण जाते.

अनेक पालकांना याची कल्पना तेव्हाच मिळते जेव्हा त्यांच्या मुलांमध्ये काही गंभीर आरोग्य समस्या निर्माण होते. तोपर्यंत त्यांचे व्यसन आटोक्यात आणण्यास उशीर झालेला असतो आणि अनेक किशोरवयीन मुलांना समुपदेशन करूनही काही फायदा होत नाही. ते आक्रमक होतात आणि सतत घुश्श्यात (रागात) असतात. गेल्या काही वर्षांत अशी अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत, ज्यामध्ये अमली पदार्थांची मोठी खेप कोणत्या ना कोणत्या बंदरावर किंवा अन्य ठिकाणी पकडली गेली. त्यांच्या आधारे देशात अमली पदार्थांचा किती मोठा व्यवसाय फोफावत आहे, याचा अंदाज बांधता येतो. पण जेव्हा जेव्हा अशा पदार्थांच्या खरेदी-विक्रीवर पायबंद घालण्याचा प्रश्न येतो, तेव्हा तेव्हा तुरळक प्रमाणात नशेचे सेवन करणाऱ्या काही लोकांना पकडून त्यांची जबाबदारी पूर्णत्वास नेली जाते. यातून यातले खरे सूत्रधार मात्र बाहेरच राहतात. काही प्रसंगी या व्यवसायात अनेक राजकीय प्रभावशाली व्यक्तींची नावेही समोर आली आहेत, मात्र यात कुणालाच नवल वाटत नाही. अशा स्थितीत किशोरवयीन आणि तरुणांमधील वाढत्या अमली पदार्थांच्या व्यसनाला आळा घालण्यासाठी सरकारी यंत्रणेने प्रबळ इच्छाशक्ती दाखवावी, अशी अपेक्षा आहे. ज्यांच्या बळावर देशाच्या विकासाची स्वप्न रंगवली जात आहेत, ती तरुण पिढीच नशेच्या आहारी गेली, तर आपल्या देशाचा विकास कसा होणार? याचा विचार गांभीर्याने झाला पाहिजे.

–मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

भारताने इतिहास डिफिट आणि रिपिट केला

९ मार्च २०२६ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्युझीलंड संघावर ९६ धावांनी विजय मिळवत टी २० विश्वचषकावर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास रचला. या विश्व विजयासोबतच भारताने अनेक विक्रम आपल्या नावे केला. या विजयासोबत भारत तिसऱ्यांदा टी २० चा विश्व विजेता संघ तर बनलाच शिवाय सलग दुसऱ्यांदा आणि घरच्या मैदानावर टी २० विश्वचषक जिंकणारा पहिला संघही ठरला याचाच अर्थ भारताने इतिहास डिफिट आणि रिपिटही केला.

स्पर्धा सुरू होण्यापूर्वी मी माझ्या 'इंडिया इतिहास डिफिट करणार आणि रिपिटही करणार' या माझ्या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते आज खरे ठरले. अर्थात यामागे कोणतेही ज्योतिष किंवा भविष्य नसून भारतीय खेळाडूंचा फॉर्म आणि गुणवत्ता पाहूनच मी तो लेख लिहिला होता. यावेळची टी २० विश्वचषक स्पर्धा भारत आणि श्रीलंका या देशात खेळली गेली. या विश्वचषक स्पर्धेत भारत सुरुवातीपासूनच भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला विश्व विजयी करायचेच अशी खूणगाठ कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती.

टी २० विश्वचषक स्पर्धेसाठी कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार करून सूर्यकुमार यादवने त्याला हवे ते खेळाडू संघात घेतले. टी २० स्पर्धेत अष्टपैलू खेळाडूंचे महत्व ओळखून त्याने संघात हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल यांचा संघात समावेश केला. वरुण चक्रवर्ती आणि वॉशिंगस्ट सुंदर यांचा समावेश संघात केला तर जगातील सर्वात घातक वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग मोहम्मद सिराज यांचा संघात समावेश करण्यात आला होता. भारताची गोलंदाजी या स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला. अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी घातक गोलंदाजी केली.

जसप्रीत बुमराने संपूर्ण स्पर्धेत जशी घातक गोलंदाजी केली तशीच घातक गोलंदाजी अंतिम सामन्यात करून ४ प्रमुख फलंदाजांना बाद केले आणि न्यूझीलंडच्या फळा फलंदाजीचा कणा मोडत भारताच्या विजयाचा मार्ग सुकर केला. केवळ बुमरानेच नाही तर सर्वच गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले आणि भारताला ९६ धावांनी एकतर्फी विजय मिळवून दिला. जसप्रीत बुमराने त्याच्या घातक गोलंदाजीने अंतिम सामन्यातील सामनावीर हा किताब मिळवला. संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष लागलेल्या या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने भारताला प्रथम फलंदाजीसाठी निमंत्रित केले. भारताने मिळालेल्या या संधीचा पुरेपूर फायदा उचलत धमाकेदार सुरुवात केली. भारताचे सलामीवीर संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी भारताला धडाकेबाज सुरुवात करून विश्व विजयाचा पाया रचला. त्यांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. अभिषेक शर्माने अर्धशतक झळकावले. या स्पर्धेत त्याला त्याच्या लौकिकाप्रमाणे फलंदाजी करता आली नाही मात्र अंतिम सामन्यात त्याने ती कसर भरून काढली.

संजू सॅमसनसाठी तर ही स्पर्धा अविस्मरणीय ठरली. सुरवातीच्या काही सामन्यात त्याला संघाबाहेर बसावे लागले पण जेव्हा त्याला संधी मिळाली तेव्हा त्याने या संधीचे सोने केले. वेस्ट इंडिज, इंग्लंड यांच्या विरुद्ध त्याने जशी स्फोटक फलंदाजी केली तशीच अंतिम सामन्यातही करून संघाला पुन्हा एकदा अडीचशेचा टप्पा ओलांडून दिला आणि भारताचा विजय पक्का केला. त्याने संपूर्ण स्पर्धेत तीनशेपेक्षा अधिक धावा काढत मालिकावीर हा किताब मिळवला. भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली . या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विश्व विजेतेपद मिळवले. सूर्यकुमार यादवने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला. भारतीय संघाचे हे विजेतेपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे टी २० चे विश्व विजेतेपद आहे.

२००७ साली भारताने पाकिस्तानला हरवत पहिल्यांदा विजेतेपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी हा होता . त्यानंतर २०२४ साली रोहित शर्मा कर्णधार असताना भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून दुसऱ्यांदा टी २० विश्वचषक जिंकला. त्यानंतर आता म्हणजे २०२६ साली भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. तीनदा टी २० विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतेपद ऐतिहासिक आहे. तीनदा टी २० विश्वचषक जिंकून भारताने आम्हीच टी २० चे चॅम्पियन आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतेपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्वावर आपली मक्तेदारी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग चार स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला तीनदा विजेतेपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून मात्र त्यानंतर मागील म्हणजे २०२४ च्या टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्व विजेतेपद मिळवले त्यानंतर मागीलवर्षी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. आता हे विश्व विजेतेपद मिळवून भारताने क्रिकेट विश्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा टी २० विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद मिळवून इतिहास रचणाऱ्या भारतीय संघाचे हार्दिक हार्दिक अभिनंदन!

–श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी सर्व स्तरावर जनजागृती करा -जिल्हाधिकारी

- १४ वर्षांच्या मुलींच्या 'एचपीव्ही' लसीकरणासाठी जिल्हा प्रशासन सज्ज
- शिक्षण विभागाच्या समन्वयाने प्रत्येक पात्र मुलीपर्यंत पोहोचावे
- एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित; पालकांनी अफवांना बळी पडू नये

नांदेड (प्रतिनिधी) –महिलांमध्ये वाढता गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्यावतीने 'एचपीव्ही' लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा आढावा मंगळवारी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या मोहिमेसाठी सर्व स्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे आणि शिक्षण विभागाच्या समन्वयाने प्रत्येक पात्र मुलीपर्यंत पोहोचण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

याबाबत त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक संपन्न झाली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. कोपूरवाड, जिल्हा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुटे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, वैद्यकीय अधिकारी मनपा, बालरोगतज्ज्ञ डॉ. राठोड, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अमृत चव्हाण, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्रीमती रेणुका दराडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि समुपदेशक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी 'एचपीव्ही' लसीकरणाच्या तांत्रिक बाजूवर सखोल चर्चा केली. १४ ते १५ वयोगटातील (१४ वर्षे पूर्ण) मुलींना या जीवघेण्या आजारापासून वाचवण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी आहे. या मोहिमेअंतर्गत पात्र मुलींना लसीचा एकच डोस दिला जाणार आहे.

या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, तालुकास्तरीय बैठका आणि पालकांचे समुपदेशन तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित आहे. समाजातील कोणत्याही अंधश्रद्धा किंवा अफवांना पालकांनी बळी पडू नये. आपल्या मुलीचे आरोग्य सुरक्षित करण्यासाठी पालकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करून लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी केले. शिक्षण विभागाने शाळांमार्फत विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये याविषयी जनजागृती करावी, असेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीत केवळ लसीकरणच नव्हे, तर जिल्ह्यातील इतर महत्त्वाच्या आरोग्य विषयांचाही आढावा घेण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने: (एड्स नियंत्रण), (स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध), (तंबाखू नियंत्रण) आणि (क्षयरोग निर्मूलन) या कार्यक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. रक्तपेढीमधील साठा, रुग्णवाहिका सेवांची उपलब्धता आणि जिल्हा कृती दलाच्या कार्याची माहिती घेण्यात आली.

माजी सैनिकांच्या पुनर्वसन व कौशल्य विकासासाठी १३ मार्च रोजी समुपदेशन

नांदेड (प्रतिनिधी) –नांदेड जिल्हा व अधिपत्याखालील क्षेत्रात माजी सैनिक व त्यांच्या विधवांची संख्या १ हजार ८३४ इतकी आहे. जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिकांना त्यांच्या आवडीनुसार योग्य कौशल्य विकास व पुनर्वसनाची संधी मिळावी यासाठी जिल्हा सैनिक कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरावर विशेष समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा समुपदेशन कार्यक्रम शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हा सैनिक कार्यालय, नांदेड येथे होणार आहे. जिल्ह्यातील सर्व इच्छुक माजी सैनिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किरण अंबेकर यांनी केले आहे.

या समुपदेशन कार्यक्रमाद्वारे माजी सैनिकांना जिल्हा कौशल्य विकास कार्यालयामार्फत त्यांच्या कौशल्यानुसार योग्य तांत्रिक अथवा शैक्षणिक अभ्यासक्रम निवडण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच विविध शासकीय व निमशासकीय नोकरीच्या संधींबाबत माहिती, आवश्यक प्रमाणपत्रांविषयी मार्गदर्शन, रोजगाराच्या संधींबाबत सल्ला तसेच पुनर्वसन प्रक्रियेत येणाऱ्या शैक्षणिक व तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

महिला महाविद्यालय येथे काव्यस्मृती भित्तीपत्रकाचे विमोचन

नांदेड (प्रतिनिधी)– के. आर. एम. महिला वरिष्ठ महाविद्यालय नांदेड येथे मराठी विभागाच्यावतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या साठाव्या आत्मार्पण दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विजया देशमुख ह्या होत्या तर याप्रसंगी कवी मनोज बोरगावकर, प्रा. डॉ. भगवान गुंजलवाड, प्रा. डॉ. कल्याण पाटील, प्रा. डॉ. मेघराज पवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.व्यंकटी पावडे यांनी केले.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. पावडे म्हणाले की, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील एक महान क्रांतिकारक राष्ट्रभक्त होते. त्यांच्या विचारांनी आणि कार्यानी अनेकांना देशभक्तीची प्रेरणा मिळाली आहे. आजच्या काळात त्यांचे राष्ट्रनिष्ठ विचार आत्मसात करणे अत्यावश्यक असून, आपण सर्वांनी त्यांचे साहित्य समजून घ्यावे व त्यांचे राष्ट्रनिष्ठ व विज्ञानवादी विचार समजून घेणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमामध्ये बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी स्नेहा पांचाळ, प्रेरणा नहारे, श्रुती आंबेकर आणि वैष्णवी घाळे यांनी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या कवितांवर आधारित 'काव्यस्मृती' भित्तीपत्रक तयार केले होते. त्याचे विमोचन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. विजया देशमुख यांनी सावरकरांचे धैर्य, त्याग व राष्ट्रनिष्ठेचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थिनींनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले आणि स्वातंत्र्यवीर सावरकर हे केवळ क्रांतिकारक नव्हते तर ते एक महान साहित्यिक, इतिहासकार आणि समाजसुधारकही होते. त्यांनी समाजात समता व एकात्मतेचा संदेश दिला. त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन राष्ट्रसेवेसाठी अर्पण केले. त्यांचे विचार आपल्याला सदैव प्रेरणा देत राहतील असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संध्या जाधव यांनी केले तर आभार प्रा. डॉ. भारत कचरे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

जागतिक महिलादिनी महिला सहेली कार्यक्रम संपन्न

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– सिडको येथील व्हीसीआय कंप्यूटर इंस्टिट्यूटच्या वतीने जागतिक महिलादिनाचे औचित्य साधून महिला सहेली दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत महाराष्ट्रात ८७ आणि NT -B मधून राज्यात प्रथम आलेल्या मेघा बालाजी गिरी आणि कुटुंबियांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात अभ्यासाचा सातबारा स्वतःविद्यार्थी जीवनात कसा अंगिकारावा हे उपयुक्त असते. याबदल नवीन पिढीतील आम्ही शेतीसाठी व अत्याधुनिक युगाचा सदुपयोग करू, अशी ग्वाही कृषी उपसंचालक मेघा गिरी यांनी दिली.

हिसीया संगणक सिडको इथे जागतिक महिला दिनानिमित्त डिजिटल सहेली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये महाराष्ट्रात ८७ आणि NT -B मधून राज्यात प्रथम आलेल्या मेघा बालाजी गिरी आणि कुटुंबासह सत्कार करण्यात आला. महिला दिनानिमित्त मार्गदर्शन, चर्चा आयोजित करण्यात आली होती. यावेळी मेघा गिरी यांनी विद्यार्थिनींशी चर्चा केली. यामुळे आत्मविश्वास निर्माण झाला यावेळी .सौ. सिंधूताई तिडके शिक्षिका, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या यांनी आपुलीय हिता जो असे जागता ।धन्य माता पिता तयाचिया ।।कुळी कन्या पुत्र होती जी सात्विक । तयाचा हरिख वाटे देवा ।। संत तुकाराम महाराजांच्या या ओळीचा अर्थ स्पष्ट करत महिलांना कुटूंबिक मार्गदर्शन प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती लाभली.

सगरोळी येथे उद्या पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी ता. बिलोली यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १२ मार्च रोजी सकाळी १० वा. पासून संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी गुरुवार, दि. १२ मार्च रोजी सकाळी १० वा.पासून संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

आरोग्य सेवेचा 'दर्जा' उंचावला; ग्रामीण रुग्णालय भोकरचे राज्यस्तरीय एनक्यूएएस मूल्यांकन

भोकर (प्रतिनिधी)– नांदेड जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत भोकर येथील ग्रामीण रुग्णालयाचे राज्यस्तरीय 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक' मूल्यांकन सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी अत्यंत उत्साहात पार पडले. या तपासणीदरम्यान रुग्णालयातील उत्कृष्ट कामकाज, रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि तांत्रिक बाबींची पूर्तता पाहून राज्यस्तरीय समितीने समाधान व्यक्त केले आहे.

राज्यस्तरीय समितीच्या प्रतिनिधी म्हणून नागपूर येथील नॅशनल असेसर डॉ. अश्विनी वाघे आणि कोल्हापूर येथील डॉ. प्रियंका साबळे यांनी रुग्णालयातील विविध विभागांची सविस्तर पाहणी केली. यामध्ये बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, प्रसूती कक्ष, प्रयोगशाळा आणि औषध साठा यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमधील सेवांचा दर्जा तपासण्यात आला. यावेळी सत्यजीत टिप्रेसवार यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे रुग्णालयाची सविस्तर माहिती समितीसमोर सादर केली.

शासनाच्या उद्दिष्टानुसार, डिसेंबर २०२६ पर्यंत हे रुग्णालय पूर्णतः मानांकित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके आणि निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. राजाभाऊ गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली या मूल्यांकनासाठी मोठी पूर्वतयारी करण्यात आली होती.

हे मूल्यांकन यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांच्यासह सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक डॉ. शामसुंदर लोखंडे, डॉ. व्यंकटेश गुडे, डॉ. अर्चना तिवारी आणि डॉ. रुबी यांनी या संपूर्ण प्रक्रियेत समन्वयाची महत्त्वाची भूमिका बजावली.

या यशामुळे भोकर आणि परिसरातील नागरिकांना भविष्यात अधिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यावेळी रुग्णालयातील सर्व इन्चार्ज सिस्टर, अधिपरिचारिका, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी तसेच वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी उपस्थित होते.

मराठवाडा शिक्षक संघाच्यावतीने माजी शिक्षक आमदार स्व. पी. जी. दस्तूरकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

नांदेड (प्रतिनिधी)– मराठवाडा शिक्षक संघ नांदेडच्या वतीने गुरुवार, दि. १२ मार्च रोजी माजी शिक्षक आमदार स्वर्गीय पी. जी. दस्तूरकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मराठवाडा शिक्षक संघाचे विभागीय अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव हे राहणार असून, याप्रसंगी शिक्षक म्हणून कार्यरत असलेले व आता महापौरपदी निवड झाल्याबद्दल कविता संतोष मुळे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.



यावेळी प्रमुख वक्ते म्हणून जी. एस. बुरांडे लातूर, प्रा. डॉ. बालाजी कोम्पलवार आणि प्रमुख अतिथी म्हणून दै. प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे, पी. एस. घाडगे, राजकुमार कदम हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त संख्येने सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे, आवाहन जिल्हाध्यक्ष व्ही. आर. चिटमलवार, विभागीय सहसचिव रेखा सोळुंके, शहराध्यक्ष डी. बी. नाईक, महिला अध्यक्ष विजयालक्ष्मी स्वामी, आनंद मोरे, आर. पी. वाघमारे, गणेश बडूरे, बालाजी टिमकीकर, मोहन पिनाटे लक्ष्मण कोंडावार, राम येडते, बाबाराव घाटे व्यंकट हुनगुंदे, जयवंत शिंदे, माधव कांजाळकर,सुनील कल्याणकर, अब्दुल हसीब, गंगाधर तेलंग, एस डी कपाटे, क्लायमेट आलाडा, रमेश पाटील, मिलिंद सर्जे, बालाजी वसमते, विनोद भुताळे यांनी केले आहे.

नृत्य-नाट्याच्या संगमात रंगला 'अंतरंग': के. रामलू इंग्लिश स्कूलचा बहारदार सांस्कृतिक महोत्सव

कुंडलवाडी (प्रतिनिधी)– येथील के. रामलू इंग्लिश मीडियम स्कूल ही संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय 'अंतरंग' सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडला. नृत्य, नाट्य आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणाच्या रंगतदार संगमाने उपस्थित रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याविष्कारांनी, सामाजिक संदेश देणाऱ्या वास्तववादी नाटकांनी तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी वातावरण भारावून गेले. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी अध्यक्षस्थानी कुंडलवाडीच्या नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार या होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्षा मैथिली कुलकर्णी, प्रतिष्ठित व्यक्ती साईनाथ उत्तरवार तसेच माजी नगराध्यक्ष भूम्मन्ना ठकूरवार यांची उपस्थिती लाभली. तर पहिल्या दिवशी अध्यक्ष म्हणून पोलीस उपविभागीय अधिकारी दशरथ पाटील यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून एपीआय ज्ञानेश्वर शिंदे तसेच डॉ. नरेश बोधनकर यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुंडलवाडी नगरपरिषदेत कार्यरत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचाही गौरव करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारा हा उपक्रम विशेष ठरला.

यावेळी शाळेतील तसेच गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. नुकत्याच निवडून आलेल्या नगरसेवक व नगरसेविका यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. समाजातील घडामोडी जनतेपर्यंत पोहोचविणाऱ्या पत्रकार बांधवांचाही यावेळी सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी १० वा. पासून बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/ रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात येणार असून, जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी मंगळवार, दि. १० मार्च २०२६ सकाळी १० वा. पासून कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी व संपर्कासाठी मा. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आनंदनगर रोड, बाबानगर नांदेड ईमेल आयडी nandedrojgar01gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ व योगेश यडपलवार ९८६०७२५४४८ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

बहुजन समाज पक्षाची नांदेड महानगर कार्यकारिणी जाहीर

नांदेड (प्रतिनिधी)– बहुजन समाज पक्षाची नांदेड येथे महत्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. यावेळी नांदेड महानगर पुरुष व महिला कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

संघटन अधिक भक्कम करण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क वाढविण्या-साठी आणि आगामी राजकीय वाटचाली संदर्भात या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. तसेच जिल्हानिहाय दौऱ्याची घोषणा करण्यात आली.

हदगाव, भोकर, देगलूर, मुखेड, नायगाव, लोहा, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण या दौऱ्याद्वारे पक्षाचे विचार घराघरांत पोहोचविणे आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करणे हा मुख्य उद्देश राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस राज्य कार्यकारिणी सदस्य इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर, प्रदेश सचिव वंदना गव्हाणे, मराठवाडा प्रभारी मनीष कावळे, जिल्हा प्रभारी लोकेश कांबळे, लक्ष्मण वायवळे, सटवाजी सोनकांबळे, शिवाजी सोनटक्के, धम्मपाल गच्चे, जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे, जिल्हा महासचिव सुधाकर सरोदे, जिल्हा कोषाध्यक्ष सखाराम इगोले आदींची उपस्थिती होती.

बैठकीत बसपाची नांदेड महानगर कार्यकारिणी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली. महानगर अध्यक्ष अनिकेत आळंदीकर, महानगर उपाध्यक्ष गोविंद वाघमारे, महानगर महासचिव महेश गायकवाड, महानगर सचिव स्वप्निल कापसे, महानगर कोषाध्यक्ष नारायण घुले.

तसेच नांदेड शहर महिला कार्यकारिणीची घोषणाही यावेळी करण्यात आली. जिल्हा प्रभारी छायाबाई गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकलाबाई ढगे आणि नांदेड शहर अध्यक्षपदी मंगलताई निलंगे यांची निवड करण्यात आली.

सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचा नांदेड जिल्हा दौरा कार्यक्रम

नांदेड (प्रतिनिधी) –राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर हे शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी सकाळी ११ वा. परभणी येथून नांदेड येथे आगमन व शासकीय विश्रामगृह येथे राखीव. सकाळी ११ ते १२ या कालावधीत हुजूर साहिब नांदेड गुरुद्वारा येथे समाधी दर्शन राखीव. दुपारी १२ ते १ या कालावधीत सर्व स्थानिक सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसाठी भेटीची राखीव वेळ व सर्कीट हाऊस. दुपारी १ ते २ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे बाबत तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारण्यासाठी केलेल्या उपाययोजना संदर्भात जाणून घेतली.

नरहरराव संगेवार यांचे निधन

नांदेड (प्रतिनिधी) –ग्रामसेवक संघटनेचे माजी अध्यक्ष नरहरराव मारोतराव संगेवार राहणार कंधार यांचे वयाच्या ९३ वर्षी वृद्धापकाळाने सोमवारी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर मंगळवारी दुपारी दोन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, चार सुना, दोन मुली, दोन जावई असा परिवार आहे. उद्योजक किशोर नोमूलवार यांचे ते सासरे होत.

अपघात शून्य वीज सेवेचे लक्ष्य ठेवावे

लाईनमन डे समारंभात राजाराम माने यांचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– लाईनमन हा विजेच्या क्षेत्रातला महत्वाचा कणा आहे. तो जपला पाहिजे, त्या सोबतच तो ज्या ज्या घटकांसाठी काम करतो त्यांचीही सुरक्षा महत्वाची आहे. त्यामुळे यापुढील काळात अपघातशून्य वीज सेवा हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून सर्वांनी काम करावे, असे आवाहन महावितरणच्या नांदेड परिमंडलाचे मुख्य् अभियंता राजाराम माने यांनी केले.

नांदेड परिमंडल कार्यालयातही तो समारंभपूर्वक साजरा करण्यात आला. नांदेड येथे झालेल्या समारंभात मुख्य् अभियंता राजाराम माने हे अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

कार्यक्रमास पायाभूत आराखडा विभागाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती निधी गौतम, सहायक महाव्यवस्थापक प्रदीप सातपुते, नांदेडचे प्रभारी अधीक्षक अभियंता विनय घनबहादूर, एम.पी. कांबळे व्यासपीठावर उपस्थित होते. लाईनमन प्रवर्गाचे प्रतिनिधी स्वाती लांडगे याही कार्यक्रमास उपस्थित होत्या.

पुढे बोलताना राजाराम माने म्हणाले की, विजेच्या क्षेत्रात लाईनमन मंडळीचे काम अत्यंत जोखमीचे आहे. ते करताना काळजीपूर्वक करण्यात यावेत. सर्व जनमित्रांनी सुरक्षा साधनांचा कटाक्षाने वापर करावा, असे आवाहन करतानाच त्यांनी सुरक्षा साधने कर्मचाऱ्यांना वेळेत पुरवठा करण्यासाठी प्रशासनाने वेळेत निविदा प्रक्रीया राबवावी अशा सुचनाही करण्यात आल्या. स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना अचुक बिलींगचा आणि डे टाईमनुसार सवलतीच्या दरांचा फायदा होत असतांनाच त्याचा फायदा जनमित्रांचे काम सोपे होण्यासाठीही होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शिवराज डांगे, सदानंद कांबळे, स्वाती लांडगे या लाईनमनच्या मनोगतांसह प्रभारी अधीक्षक अभियंता विनय घनबहादूर, सहायक महाव्यवस्थापक प्रदीप सातपूते, आदींचीही समयोचित भाषणे झाले. प्रारंभी दीप प्रज्वलनानंतर उपस्थित सर्व लाईनमन कर्मचाऱ्यांचे महावितरणच्या वतीने स्वागत करण्यात येवून त्यांच्या कार्याबद्दल त्यांचे कौतुकही करण्यात आले.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

निरामय

तिशी ओलांडल्यानंतर वजन कमी करणे महिलांसाठी एक आव्हान बनते. यामागील कारण त्यांची कमकुवत इच्छाशक्ती नाही, तर हार्मोनल, चयापचय आणि जीवनशैलीचे घटक आहेत. जरी त्यांचा आहार आणि व्यायाम समान राहिले तरी वजन वेगाने वाढते, ज्यामुळे ते कमी करणे खूप अवघड बनून जाते. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आणि प्रभावी उपाययोजना करण्यासाठी तिशीनंतर महिलांच्या वजन कमी करण्याच्या प्रवासात अडथळा आणणारे घटक तपशीलवार समजून घेणे महत्वाचे आहे. शरीरात होणाऱ्या बदलांचा मागोवा घेण्यासाठी काही चाचण्या करत राहणेदेखील महत्वाचे आहे...

तिशीनंतर महिलांना वजन कमी करणे का होते कठीण?

वजन कमी करण्यासाठी होणाऱ्या संघर्षाची कारणे...

» हार्मोनल बदल : खरं तर या वयोगटात विशेषतः मासिक पाळी दरम्यान आणि बाळंतपणानंतर इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉनच्या पातळीची लक्षणीयरीत्या चढ- उतार होते. याचा परिणाम शरीरात चरबी साठवण्याच्या पद्धतीवर होतो. म्हणूनच ३० आणि त्याहून अधिक वयाच्या महिलांमध्ये पोटाची चरबी जास्त जमा होते. फक्त हेच नाही तर इस्ट्रोजेनची पातळी कमी झाल्यामुळे शरीराला इन्सुलिनची पातळी व्यवस्थापित करणे देखील कठीण होते. यामुळे रक्तातील साखर नियंत्रित करणे कठीण होते, ज्यामुळे वजन आणि चरबी वाढण्यास देखील हातभार लागतो.

» स्नायूंच्या वस्तुमानात घट : स्नायू हा टिशूचा असा प्रकार आहे, जो उर्जेचा वापर करून शरीराचा चयापचय दर वाढविण्यास मदत करतो. ते सहसा विश्रांती घेत असतानाही सक्रिय राहते. जेव्हा ३० नंतर स्नायूंचे वस्तुमान कमी होऊ लागते, तेव्हा विश्रांती घेताना कॅलरी बर्न कमी होते. याचा अर्थ असा की जर हालचाल नसेल तर कॅलरीज लक्षणीयरीत्या कमी बर्न होतात. जेव्हा ही स्थिती दीर्घकालीन ताण, झोपेची कमतरता आणि जास्त कामाचे तास यासारख्या सवयींसह एकत्रित केली जाते, तेव्हा कॉर्टिसॉल हार्मोन वाढतो, ज्यामुळे वजन वाढण्यास मदत होते.

» थायरॉईड आणि पीसीओएस : या वयात थायरॉईड फंक्शन आणि पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम सारख्या परिस्थितींचे निरीक्षण करणे अत्यंत महत्वाचे आहे. किरकोळ थायरॉईड समस्या देखील शरीराच्या कॅलरीजमधून ऊर्जा वापरण्याच्या क्षमतेवर नकारात्मक परिणाम करू शकतात. थायरॉईडचे कार्य मंदावल्याने दिवसभर थकवा येऊ शकतो आणि व्यायाम करण्यात अडचण येऊ शकते. हे घटक वजन वाढण्यास हातभार लावू शकतात.

वजन कमी करण्यासाठी हे व्यायाम करा...

३० आणि त्यावरील वयाच्या महिलांना सल्ला असा आहे, की फक्त कमी खाल्ल्याने अपेक्षित परिणाम मिळणार नाहीत. वजन कमी करण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनात पूर्णपणे बदल करणे आवश्यक असेल. महिलांनी त्यांचे स्नायू मजबूत ठेवण्यासाठी आठवड्यातून दोन ते तीन वेळा स्ट्रेंथ ट्रेनिंगवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. यासोबतच, त्यांनी स्पीड वॉकिंग, पोहणे आणि सायकलिंग सारख्या हलक्या कार्डिओ वर्कआउट्समध्ये देखील सहभागी व्हावे. तथापि, कोणत्याही प्रकारचे व्यायाम जास्त न करण्याची काळजी घ्या. विश्रांतीशिवाय तीव्र वर्कआउट्स सुरू ठेवल्याने ताण वाढू शकतो. ज्यामुळे शरीरात हानिकारक हार्मोन्स वाढू शकतात.

30 नंतर असा आहार ठेवा

जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही पूर्वीसारखाच आहार राखून वजन कमी करू शकता किंवा राखू शकता, तर तुम्ही चुकीचे आहात. ३० नंतर, शरीराच्या गरजा बदलतात, त्यामुळे काही आहारातील बदल आवश्यक असतात. या वयाच्या महिलांसाठी आहारात प्रथिने आणि फायबरचे प्रमाण जास्त असले पाहिजे. जेणेकरून स्नायू तयार होतील आणि भूक नियंत्रित होईल. कॅलरीजचे प्रमाण कमी केले पाहिजे. आहारात अंडी, बीन्स, दुग्धजन्य पदार्थ, टोफू, मासे आणि अधिक भाज्यांचा समावेश केल्याने रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत होते. जास्त प्रक्रिया केलेले पदार्थ, साखरेचे पेये आणि स्नॅक्स खाणे टाळा. कारण यामुळे रक्तातील साखरेची पातळी बिघडण्यासह अनेक आरोग्यविषयक गुंतागुंत होऊ शकतात. जेवण वगळणे, जास्त उपवास करणे आणि जास्त प्रमाणात पूरक आहार घेणे टाळले पाहिजे. हे चरबी कमी करण्यास मदत करण्याऐवजी हार्मोन्समध्ये व्यत्यय आणू शकते. तज्ज्ञांची मदत घेणे आणि तुमचे वय आणि आरोग्यानुसार सर्वोत्तम आहार चार्ट किंवा जेवण योजना पाळणे चांगले. यामुळे तुमच्या आरोग्याशी तडजोड न करता वजन राखता येईल.

या गोष्टी तपासल्या पाहिजेत...

प्रत्येक वयोगटातील महिलांसाठी काही महत्त्वाच्या चाचण्या आहेत ज्या त्यांनी करत राहिल्या पाहिजेत. ३० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांनी त्यांचे थायरॉईड फंक्शन, व्हिटॅमिन डी लेव्हल, उपवासानंतर रक्तातील साखर, सरासरी रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉलची पातळी तपासली पाहिजे. PCOS किंवा पेरीमेनोपॉजसाठी हार्मोन तपासणी देखील आवश्यक आहे. जर तुम्हाला इतर कोणतीही अस्वस्थता जाणवत असेल, तर तज्ज्ञांची मदत घेण्यास अजिबात संकोच करू नका.

अचानक आनंदी, अचानक दु:खी... ही तर 'बायपोलर डिसऑर्डर'ची लक्षणे!

जगभरातील सातपैकी एक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या मानसिक आरोग्य विकाराने ग्रस्त आहे. यापैकी एक बायपोलर डिसऑर्डर आहे. वेळेवर उपचार सुरू न केल्याने सामान्य जीवन देखील कसे आव्हानात्मक बनू शकते याची मी नेहमीच लोकांना जाणीव करून देण्याचा प्रयत्न करतो. वेळेवर आणि योग्य उपचारांसाठी, बायपोलर डिसऑर्डरची चेतावणी देणारी चिन्हे समजून घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. कारण त्याची लक्षणे पुरुष आणि महिलांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे दिसू शकतात.



उपचार करता येतो का?

बायपोलर डिसऑर्डर ही दीर्घकालीन स्थिती आहे. तथापि, योग्य उपचारांसह, ती प्रभावीपणे नियंत्रित केली जाऊ शकते, ज्यामुळे प्रभावित व्यक्तीला संतुलित जीवन जगण्यास मदत होते. उपचारांमध्ये औषधे महत्त्वाची भूमिका बजावतात. वैद्यकीय देखरेखीखाली, रुग्णांना मूड स्टेबिलायझर्स, अँटीसायकोटिक्स किंवा अँटीडिप्रेसेंट्स सारखी औषधे लिहून दिली जातात. मानसशास्त्रज्ञ व्यक्तींना मूड पॅटर्न समजून घेण्यास, ट्रिगर्स ओळखण्यास आणि त्यांचे वर्तन व्यवस्थापित करण्यास मदत करण्यासाठी संज्ञानात्मक वर्तणूक थेरपी आणि कुटुंब-केंद्रित थेरपी सारख्या तंत्रांचा देखील वापर करतात. चांगली झोप, संतुलित आणि निरोगी आहार, व्यायाम आणि ताण व्यवस्थापन यासारख्या जीवनशैलीच्या सवयींचा समावेश करणे देखील खूप प्रभावी ठरते. कुटुंबाचा आधार, लक्षणे लवकर ओळखणे आणि त्वरित उपचार हे एकूण उपचार अधिक प्रभावी आणि दीर्घकाळ टिकणारे बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

बायपोलर डिसऑर्डर म्हणजे काय?

बायपोलर डिसऑर्डर ही एक गंभीर मानसिक आरोग्य स्थिती आहे. ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीचा मूड दोन अत्यंत अवस्थेत प्रकट होऊ शकतोः मॅनिक आणि डिप्रेशन. हे एपिसोड स्वतंत्रपणे किंवा एकाच वेळी येऊ शकतात. ते एखाद्या व्यक्तीच्या विचारसरणी, वर्तन, निर्णय घेण्याची क्षमता, नातेसंबंध आणि व्यावसायिक जीवनावर खोलवर परिणाम करतात. मॅनिक एपिसोड या अवस्थेत, व्यक्ती खूप उत्साही, ऊर्जावान आणि आत्मविश्वासू वाटतो. यामुळे उतावीळपणे धोकादायक निर्णय घेऊ शकतो. डिप्रेसिव्ह एपिसोड या अवस्थेत व्यक्तीला खोल दुःख आणि निराशा येते. त्यांना सतत थकवा जाणवतो आणि गोष्टींमध्ये आणि जीवनाच्या इतर पैलूंमध्ये रस कमी होतो. गंभीर प्रकरणांमध्ये, व्यक्ती आत्महत्या देखील करू शकते.

बायपोलर डिसऑर्डरची कारणे...

बायपोलर डिसऑर्डरचे कोणतेही एक निश्चित कारण नाही. ते जैविक, अनुवांशिक, पर्यावरणीय किंवा बाह्य घटकांमुळे होऊ शकते. बायपोलर डिसऑर्डर किंवा इतर कोणत्याही मूड डिसऑर्डरचा कौटुंबिक इतिहास या मानसिक आरोग्य समस्येचा धोका लक्षणीयरीत्या वाढवतो. हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अनुवंशिकतेद्वारे संक्रमित झाल्यामुळे होते. मेंदूतील न्यूरोट्रांसमीटरमध्ये असंतुलन, जसे की डोपामाइन आणि सेरोटोनिन देखील एखाद्या व्यक्तीच्या विकासात योगदान देऊ शकते. कारण हे रासायनिक संदेशवाहक मूड आणि भावनांचे नियमन करतात. या विकारांमधील व्यत्ययांमुळे बायपोलर डिसऑर्डरसारखे मूड डिसऑर्डर होऊ शकतात. दीर्घकाळापर्यंत आणि तीव्र ताणतणाव, आघात, अत्यधिक झोपेची कमतरता किंवा जीवनातील एखादी मोठी घटना देखील बायपोलर डिसऑर्डरला चालना देऊ शकते. अल्कोहोल किंवा ड्रग्जचा गैरवापर देखील मूड अस्थिर करू शकतो आणि बायपोलर लक्षणे गुंतागुंतीची करू शकतो.

बायपोलर डिसऑर्डरची चेतावणी देणारी चिन्हे

बायपोलर डिसऑर्डरमध्ये दिसणारे मूड स्विंग नेहमीच तीव्र असतात, म्हणून त्यांना फक्त मूड स्विंग समजू नये. त्याऐवजी, लक्षणे ओळखा आणि त्वरित उपचाराची मदत घ्या.

मॅनिक एपिसोडची लक्षणे

- » असामान्य उत्साही
- » स्थिर बसण्यास असमर्थता
- » अत्यधिक बोलके
- » झोप नसतानाही अतिक्रियाशील राहणे
- » वेगाने बोलणे
- » मनात विचार धावत राहणे
- » अति आत्मविश्वास वाटणे
- » स्वतःला खूप मोठे किंवा शक्तिशाली समजणे
- » जोखमीचे निर्णय घेणे

डिप्रेसिव्ह एपिसोडची लक्षणे

- » सतत उदास राहणे
- » आतून रिकामेपणा अनुभवणे
- » पूर्वी आवडलेल्या गोष्टींमध्ये रस कमी होणे
- » झोपेच्या पद्धतींमध्ये लक्षणीय बदल
- » भूकेच्या पद्धतींमध्ये बदल
- » कोणत्याही गोष्टीवर, संभाषणांवर किंवा विषयांवर लक्ष केंद्रित करण्यास असमर्थता
- » निराशेच्या सततच्या भावना
- » स्वतःला हानी पोहोचवण्याचे विचार
- » जर ही लक्षणे अनेक दिवस किंवा आठवडे टिकून राहिली आणि एखाद्या व्यक्तीच्या दैनंदिन क्रियाकलापांवर, नातेसंबंधांवर आणि व्यावसायिक जीवनावर परिणाम करू लागली तर त्वरित मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

सर्वाधिक परिणाम कोणत्या वयोगटावर?

बायपोलर डिसऑर्डर बहुतेकदा पौगंडावस्थेच्या उत्तरार्धात किंवा तरुण वयात, १८ ते ३० वयोगटातील दरम्यान सुरू होतो. तथापि, क्वचित प्रसंगी, तो मुलांमध्ये किंवा मध्यम वयात देखील दिसू शकतो. बायपोलर डिसऑर्डरवर योग्य वेळी उपचार सुरू करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मूड डिसऑर्डर पुरुष आणि महिला दोघांनाही होतो. तथापि, लक्षणे वेगवेगळी असू शकतात. पुरुषांना मॅनिक एपिसोड्स होण्याची शक्यता जास्त असते, तर महिलांना डिप्रेसिव्ह एपिसोड्स आणि जलद मूड स्विंग्स होण्याची शक्यता जास्त असते. गर्भधारणेदरम्यान आणि प्रसूतीनंतरच्या काळात हार्मोनल चढउतार महिलांच्या मूड स्विंग्समध्ये लक्षणीय वाढ करू शकतात. यामुळे मूड डिसऑर्डरचा धोका वाढतो. म्हणून, या काळात विशेष काळजी आणि देखरेख आवश्यक आहे.

उन्हाळ्यात उष्माघात टाळणे महत्वाचे...

उन्हाळा सुरू झाला आहे आणि तापमान ४६ अंश सेल्सिअसच्या जवळ येताच उष्माघाताने ग्रस्त रुग्णांची संख्या वाढायला सुरुवात होईल. गंभीर परिस्थिती टाळण्यासाठी प्रत्येकाने पुरेसे पाणी, इलेक्ट्रोलाइटयुक्त पेये आणि पाणीयुक्त फळे यांचे सेवन वाढवावे. जेव्हा हवामान गरम होते तेव्हा शरीराची वाढत्या सभोवतालच्या तापमानाला सहन करण्याची क्षमता धोक्यात येते. यामुळे उष्माघात होऊ शकतो. २०२५ मध्ये भारतात उष्माघाताचे ७,००० हून अधिक प्रकरणे नोंदवली गेली. म्हणून, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की ही केवळ आरोग्य समस्या नाही तर वाढती आरोग्य आणीबाणी आहे...

हे टाळण्यासाठी काय करावे?

- » प्रथिने, कार्बोहायड्रेट्स आणि निरोगी द्रवपदार्थांनी समृद्ध संतुलित आहार घ्या.
- » दररोज ३ ते ४ लिटर पाणी पिऊन हायड्रेटेड रहा.
- » नारळ पाणी, ताक किंवा ओआरएस सारख्या इलेक्ट्रोलाइटयुक्त पेयांसह द्रव संतुलन राखा.
- » टरबूज, पपई, काकडी आणि संत्री यांसारखी पाणीयुक्त फळे खा.
- » अति तेलकट आणि मसालेदार पदार्थ शरीराला जास्त गरम करू शकतात, म्हणून ते टाळा.
- » तुमच्या आहारात सॅलड समाविष्ट करा आणि कमी प्रमाणात खा.

उष्मा थकवा अन् उष्माघातात काय फरक...

दोन्ही परिस्थिती उष्णता आणि उच्च पर्यावरणीय तापमानाशी संबंधित आहेत, परंतु लक्षणे आणि तीव्रतेमध्ये भिन्न आहेत. जेव्हा शरीर अति तापमानाशी जुळवून घेऊ शकत नाही आणि थंड होण्यासाठी संघर्ष करत असते तेव्हा उष्मा थकवा जाणवतो. शरीर त्याच गरम वातावरणात राहिले तरी जास्त घाम येणे, थकवा, चक्कर येणे, मळमळ आणि जलद नाडी यासारखी लक्षणे उद्भवू शकतात. उष्माघात ही एक अधिक गंभीर आणि धोकादायक स्थिती आहे ज्यामध्ये शरीराचे अंतर्गत तापमान ४०C पेक्षा जास्त होते. यामुळे गोंधळ, जलद हृदयाचे ठोके, काळोख आणि बेशुद्धी होऊ शकते. म्हणून, उष्माघाताची सुरुवातीची लक्षणे ओळखणे आणि नियंत्रित करणे उष्माघात आणि इतर गंभीर परिणाम टाळण्यास मदत करू शकते.

जीवनशैलीत हे बदल करा...

उष्णतेशी संबंधित आरोग्य समस्या टाळण्यासाठी संतुलित आहार आणि हायड्रेशनसह निरोगी जीवनशैली आवश्यक आहे. उन्हात जाण्यापूर्वी हलक्या रंगाचे, पूर्णपणे झाकलेले कपडे घाला. व्यायाम आणि व्यायामासाठी थंड सकाळ निवडा. तीव्र सूर्यप्रकाश किंवा उष्णतेदरम्यान सावलीत रहा. दर ३० ते ४० मिनिटांनी तुमच्या हायड्रेशनची पातळी तपासा. जर तुम्हाला चक्कर येणे, डोकेदुखी, मळमळ किंवा जास्त घाम येणे यासारखी उष्णतेच्या थकव्याची लक्षणे आढळली तर ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या. पौष्टिक आहार घेणे, पुरेसे हायड्रेशन राखणे आणि जीवनशैलीत काही बदल केल्याने तुम्हाला तीव्र उष्णतेदरम्यान सुरक्षित आणि निरोगी राहण्यास मदत होऊ शकते. उष्मा थकवा आणि उष्माघाताची सुरुवातीची लक्षणे ओळखून, आवश्यक ती खबरदारी घेतल्यास आणि वैद्यकीय मदत घेतल्यास गंभीर परिणाम टाळता येतात. याव्यतिरिक्त, आहारात थंड पदार्थांचा समावेश करणे, योग्य कपडे घालणे आणि उच्च जोखीम असलेल्या व्यक्तींसाठी आवश्यक खबरदारी घेणे यासारखे प्रयत्न आपल्याला उन्हाळा निरोगी पद्धतीने घालवण्यास मदत करू शकतात.

कोणाला जास्त धोका?

जेव्हा आपल्या सभोवतालचे तापमान वाढू लागते तेव्हा काही लोकांना जास्त धोका असतो. ६५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांना गंभीर लक्षणे जाणवण्याची शक्यता जास्त असते. कारण त्यांच्या शरीराची घाम निर्माण करण्याची क्षमता कमी होते. शिवाय, कर्करोग, लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयरोग यांसारखे जुनाट आजार देखील शरीराची स्वतःला थंड करण्याची क्षमता बिघडू शकतात. लहान मुलांचे शरीर नाजूक असते. त्यामुळे ते उष्णतेसाठी अधिक संवेदनशील बनतात आणि त्यांची उष्णता सहन करण्याची क्षमता देखील कमी होते. खेळाडू आणि जुनाट आजारांनी ग्रस्त असलेले लोक देखील उच्च-जोखीम गटात येतात.

७.५ एचपीच्या मर्यादित वीज वापर आणल्यास शेतकऱ्यांना मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेचा लाभ -मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई (प्रतिनिधी) –मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना ही केवळ ७.५ हॉर्सपॉवरपर्यंत वीज वापर करणाऱ्यांसाठी लागू आहे. शेतकरी ग्राहकांनी आवश्यक उपाययोजना करून वीज वापर ७.५ हॉर्सपॉवरच्या आत आणल्यास त्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील कृषी पंपधारक शेतकरी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेपासून वंचित राहत असल्याबाबतचा प्रश्न सदस्य सत्यजित देशमुख यांनी विधानसभेत उपस्थित केला. या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनी सहभाग घेतला.

शिराळा (जि. सांगली) येथील काही शेतकऱ्यांनी वीज वापर जास्त दाखविल्याची तक्रार केली होती. या प्रकरणी ५२ वीज जोडण्यांची स्थळ तपासणी करण्यात आली. या चौकशीत संबंधित शेतकऱ्यांना दिलेली वीज बिले योग्य असून त्यांचा प्रत्यक्ष वीज वापर अधिक असल्याचे आढळून आले आहे. सध्या या ग्राहकांसाठी स्वतंत्र विशेष दर लागू असून तो सर्वसाधारण दरापेक्षा वेगळा आहे. तरीही संबंधित ग्राहकांना आणखी काही दिलासा देता येऊ शकतो का, याबाबत शासन सकारात्मकपणे विचार करणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ७.५ हॉर्सपॉवरपेक्षा जास्त वीज वापरणाऱ्या ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही. कृषी पंपांचे वर्गीकरण हे महावितरणकडून नव्हे तर महाराष्ट्र वीज नियामक आयोग कडून निश्चित केले जाते. यासंदर्भात शेतीसाठी स्वतंत्र वर्गीकरणाचा मुद्दा आयोगासमोर मांडण्यात आला होता; मात्र त्यास मान्यता मिळालेली नाही. तरीही यामध्ये शेतकऱ्यांना काही दिलासा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

काँग्रेस नेत्याची आमदारकी रद्द; उच्च न्यायालयाने दिले भाजपच्या पराभूत उमेदवाराला आमदार घोषित करण्याचे आदेश

मुंबई (प्रतिनिधी)– भाजप नेते आणि माजी मंत्री रामनिवास रावत यांनी उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केली होती. मुकेश मल्होत्रा यांनी पोटनिवडणुकीदरम्यान आपल्या नामांकन अर्जात गुन्हेगारी रेकॉर्डची माहिती लपवल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला होता. मल्होत्रा यांच्यावर ६ गुन्हेगारी गुन्हे दाखल होते, ज्याचा उल्लेख त्यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात केला नव्हता, अशी माहिती रावत यांनी न्यायालयाला दिली होती.

मध्य प्रदेशातील विजयपूर विधानसभा मतदारसंघाच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. ग्वाल्हेर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने काँग्रेस आमदार मुकेश मल्होत्रा यांची निवडणूक रद्द केली आहे. न्यायालयाने केवळ मल्होत्रा यांची निवडच रद्द केली नाही, तर या प्रकरणातील याचिकाकर्ते आणि पोटनिवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर राहिलेले भाजप नेते रामनिवास रावत यांना विजयपूरचे नवे आमदार म्हणून घोषित करण्याचे आदेश दिले आहेत.

झाडे लावा, झाडे जगवा

हिंद-दी-चादर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

मुंबई (प्रतिनिधी) –श्री गुरु तेग बहादूर साहेब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्ताने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनात हिंद-दी -चादर' या नृत्य नाट्य, गीतांच्या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन १२ ते २३ मार्च दरम्यान राज्यात आठ ठिकाणी करण्यात आले आहे.

श्रीगुरु तेग बहादुर जी यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी धर्म स्वातंत्र्य मानवता आणि सहिष्णुतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांचे जीवनकार्य संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारी ढाल) असेही संबोधले जाते.

युद्धामुळे सोन्याच्या भावात उसळी

मुंबई(प्रतिनिधी)– जागतिक राजकारणातील तणाव आणि इराण इस्त्रायल युद्धजन्य परिस्थितीचा थेट फटका जन सामान्यांना बसत आहे. मौल्यवान धातुंसह गॅसच्या दरातही वाढ झाली आहे. यामुळे सामान्यांचे कंबरडे मोडणार हे निश्चित. सध्या लग्नसराईचा मौसम सुरु आहे. मेपर्यंत अनेक घरांत सनईचे सुर घुमू लागतील. लग्न म्हटलं सोनं अन् चांदीची खरेदी होतेच. दरम्यान, जागतिक पातळीवर सुरु असलेल्या युद्धजन्य स्थितीचा थेट फटका सामान्यांच्या खिशाला बसत आहे. सोन्यासह चांदीच्या दराने उच्चांक गाठला आहे.

मुखेड नगर परिषद, मुखेड

नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड. जि. नांदेड

दूरध्वनी क्र. 02461-222562. Email ID:- comukhed@gmail.com

जा. क्र. 420 दिनांक :- 10/03/2026

जाहीर ई-निविदा सूचना

मुख्याधिकारी नगर परिषद मुखेड जि.नांदेड यांच्या वतीने मुखेड नगर परिषद अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत वर्ष 2025-26 मधील मुखेड शहरात नगर परिषद अंतर्गत समतानगर मध्ये मुखेड शहरातील आशितोष कांबळे ते सुनिल शेळके यांच्या घरापर्यंत सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे (फुलेनगर) च्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत वर्गातील कंत्राटदाराकडून B1 निविदा सीलबंद लिफाफामध्ये स्पर्धात्मक ई-निविदा महाराष्ट्र शासन www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. 11-03-2026 ते दि. 18-03-2026 पर्यंत मागवण्यात येत आहेत, सविस्तर जाहिरात अटी शर्ती माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे ई-निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी न.प. मुखेड यांना राखून ठेवला आहे

(राजेश जाधव)
तहसिलदार तथा मुख्याधिकारी
मुखेड नगर परिषद मुखेड

(सौ. विजया)
(विजया देवडवार)
अध्यक्षा
मुखेड नगर परिषद मुखेड,

शुद्धीपत्रक

श्री संगमेश्वर देवस्थान संगम ता. बिलोली, जि. नांदेड (ए-२२८४) नांदेड या देवस्थानची जाहिरात दिनांक ९/३/२०२६ रोजीच्या दैनिक गोदातीर समाचार या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली असून, सदर प्रगटनामध्ये दिनांक १३/३/२०२६ व दिनांक १४/३/२०२६ रोजी जमिनीची लावण करण्यासाठी बोली (लिलाव) लावण्यात येणार असा उल्लेख करण्यात आला आहे. त्या ऐवजी दिनांक १२/३/२०२६ व दिनांक १३/३/२०२६ असे वाचावे. दिनांक १२/३/२०२६ रोजी दुपारी १ वाजता बोली सुरू करण्यात येईल. तसेच दिनांक १३/३/२०२६ रोजी सकाळी ठिक ११ वाजता बोली सुरू करण्यात येणार आहे.

अध्यक्ष
श्री संगमेश्वर देवस्थान, संगम
ता. बिलोली, जि. नांदेड

टी. सी. हरवली

माझी ज्ञानेश्वर किशनराव शिंदे या नावाची इयत्ता १२ वी पासची टी. सी. वजिराबाद ते रेल्वे स्टेशन प्रवासात हरवली आहे. ज्यांना कुणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील मोबाईलवर संपर्क करावा.

संपर्क नंबर– मो. ७४१०१७१६६१

टी. सी. हरवली

माझी सोमनाथ धनराज सूर्यवंशी या नावाची बी.टेक. इंजीनियरिंग नापासची टी. सी. (मायग्रेशन) ईकळीमाळ ते नायगाव बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा. **संपर्क पत्ता**– सोमनाथ धनराज सूर्यवंशी रा. ईकळीमाळ ता. नायगाव, जि.नांदेड
मो. ९५५२९३८८२९

टी. सी. हरवली

माझी बीस्ट अरूषी करण रा. नरसी ता.नायगाव जि.नांदेड या नावाची इयत्ता नववी पास ची टि.सी. नरसी ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा.

संपर्क पत्ता– आरुषी करण रा. नरसी ता. नायगाव जि.नांदेड

जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६४/२०२६ पुढील तारीख-१०.०४.२०२६

१. पोचाबाई तुकाराम प्रचंड, वय ६० वर्षे, व्यवसाय शेती, रा. येसगी ता. बिलोली जि. नांदेड. २. पिराजी तुकाराम प्रचंड, वय-४५ वर्षे, व्यवसाय शेती, रा. येसगी ता. बिलोली जि. नांदेड. ३. करुणा सयदू प्रचंड, वय ४० वर्षे, व्यवसाय शेती, रा. येसगी ता. बिलोली जि. नांदेड, ४. राजरतन सयदू प्रचंड, वय -२१ वर्षे, व्यवसाय मजूरी, रा. येसगी ता. बिलोली जि. नांदेड, ५. उज्वला धोंडीबा टोंपे, वय - ४० वर्षे, व्यवसाय - मजूरी, रा. हुंसा ता. बोधन जि. निझामाबाद. तेलंगाना राज्य, ६. गायणी लक्ष्मी गायणी गंगाधरख् वय - ३६ वर्षे, व्यवसाय शेती, रा. डोणपाल एम मोरताड, जि. निझामाबाद तेलंगाणा राज्य.

विरुद्ध
गैरअर्जदारः निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०६ हे मयत तुकाराम जळबा प्रचंड यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार कमांक ०१ हि मयत तुकाराम जळबा प्रचंड यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०२ हा मुलगा आहे. अर्जदार क्रमांक ०५ ते ०७ हया मुली आहेत. मयत तुकाराम जळबा प्रचंड यांचा मुलगा नामे सयदू तुकाराम प्रचंड यांचा मृत्यू झालेला असुन अर्जदार क्रमांक ०३ हि त्यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०४ हा मुलगा आहे. मयत तुकाराम जळबा प्रचंड यांचा मृत्यू दिनांक १०.०७.२०२१ रोजी झाला. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०६ यांना मयत तुकाराम जळबा प्रचंड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक — दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली
सहा अधिक्षक — दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली

जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात, किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ६६/२०२६
पुढील तारीख - १३.०४.२०२६

अर्जदार : १. चंदरबाई बालाजी साळुंके, वय-७१ वर्षे, व्यवसाय शेती, २. भाग्यश्री गजानन पायरे वय-४१ वर्ष, व्यवसाय शेती, ३. वच्छलाबाई नरसिंग लश्करे वय-३६ वर्षे, व्यवसाय-शेती, ४. गंगासागर शिवाजी पेंडले, वय-४१ वर्षे, व्यवसाय शेती, ५. निळकंठ बालाजी साळुंके, वय-३३ वर्षे, व्यवसाय शेती, ६. प्रल्हाद बालाजी साळुंके, वय ४१ वर्षे, व्यवसाय-शेती, रा. दुगांव ता. बिलोली, जि. नांदेड.

विरुध्द
गैरअर्जदारः निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०६ हे मयत बालाजी विक्रम साळुंके यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार कमांक ०१ हि मयत बालाजी विक्रम साळुंके यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०२ ते ०४ हे मुली आहेत. अर्जदार क्रमांक ०५ व ०६ हे मुले आहेत मयत बालाजी विक्रम साळुंके यांचा मृत्यू दिनांक ०१.०२.२०१६ रोजी झाला. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमां ०१ ते ०६ यांना मयत बालाजी विक्रम साळुंके यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक — दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली
सहा. अधिक्षक — दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली

Change In Name

My Old Name is SIDDIQA FERDOS which now I am changing as New Name SIDDIQA FIRDOOS SHAIKH MOHIUDDIN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H. No. 9-4-940 MADINA NAGAR DEGLOOR NAKA, ITWARA, NANDED
Mo. No. 7020361090

ॲफिडेव्हीट

मी शेख रईसाबानू शे. हाजी लग्नानंतरचे नाव रईसाबी जब्बार शेख वय ४५ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा. नरसी ता. नायगाव, जि. नांदेड असे असून सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की, मी वरील पत्त्यावर राहत असून, माझे लग्नापूर्वीचे नाव शेख रईसाबानू शे. हाजी असे होते. त्यांनतर माझे लग्न सन २४/०५/२००६ रोजी मु. पो. नरसी येथे जब्बार शेख यांच्याबरोबर झाले असून लग्नानंतर माझे नाव रईसाबी जब्बार शेख असे झाले आहे. माझ्या टी.सी. वर शेख रईसाबानू शे. हाजी असे आहे व आधार कार्ड, पॅन कार्डवर रईसाब जब्बार शेख असे आहे. तरी शेख रईसाबानू शे. हाजी व रईसाबी जब्बार शेख ही दोन्ही नावे माझीच असून, या दोन्ही नावाची व्यक्ती मी एकच आहे. याच्या सत्यतेसाठी सदरील मी ॲफिडेव्हीट केले आहे. वर नमूद केलेली सर्व माहिती खरी असून सत्यतेबावत काहीही खोटे आढळून आल्यास मी भारतीय दंड संहिता कलम १९९ व २०० च्या तरतुदीनुसार होणाऱ्या कायदेशीर कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे. येणे प्रमाणे सदर ॲफिडेव्होटमधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून आज रोजी नरसी मुक्काम मी त्यावर माझी सही केली असे.

शेख रईसाबानू शे. हाजी
लग्ना नंतरचे नाव रईसाबी जब्बार शेख
ॲफिडेव्हीट करणार

जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५७/२०२६ पुढील तारीख ३०.०३.२०२६

अर्जदार-हाणमाबाई भ्र. लक्ष्मणराव क्याशोड, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड.

विरुध्द
गैरअर्जदारः निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हा मयत निलाबाई धोंडिबा मुकडे यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदारांचे कथन आहे की, अर्जदार हि मयत निलाबाई धोंडिबा मुकडे यांची मुलगी असुन अर्जदाराची आई मयत निलाबाई धोंडिबा मुकडे यांचा मृत्यू दिनांक २१.०१.२०२६ रोजी झाला. अर्जदार यांनी कथन केले आहे की, अर्जदार यांना मयत निलाबाई धोंडिबा मुकडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २६/०२/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक — दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली
सहा अधिक्षक — दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली

जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५५/२०२६
शंकर व ईतर विरुध्द निरंक

अर्जदार - १. शंकर पि. लिंगप्पा पांचाळ, वय - ५२ वर्षे, रा. अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड २. प्रिती संदिप पांचाळ, वय - ३२ वर्षे, रा. औराळ ता. मुखेड जि. नांदेड ३. अभिनय शंकर पांचाळ, वय - ३० वर्षे, रा. अर्जापुर ता. बिलोली जि. नांदेड

विरूध्द
निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे अर्जदार क्र. १ हे पती व अर्जदार क्र. २ ही मुलगी तसेच अर्जदार क्र. ३ हा मुलगा आहे. अर्जदार हे मौजे अर्जापुर ता. बिलोली जि.नांदेड येथे वास्तव्यास होते. मयत सुनिता शंकर पांचाळ यांचा मृत्यु दिनांक दि. १४/०९/२०२० रोजी झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०७/०४/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली

जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६०/२०२६ पुढील तारीख - १३.०४.२०२६

अर्जदार : १. वंदना भ्र. हाणमंत वाघमारे, वय-४७ वर्षे, व्यवसाय - घरकाम, २. किरण पि. हाणमंत वाघमारे, वय २६ वर्षे, व्यवसाय-शिक्षण, ३. कुलदीप पि. हाणमंत वाघमारे, वय २५, व्यवसाय-शिक्षण, ०४. समीक्षा पि. हाणमंत वाघमारे, वय २२ वर्षे, व्यवसाय-घरकाम, ०५. मरुबाई भ्र. गोपाळ वाघमारे, वय ७७ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा. कांगठी ता. बिलोली, जि. नांदेड

विरुद्ध
गैरअर्जदार-निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ हे मयत हाणमंत गोपाळ वाघमारे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार कमांक ०१ हि मयत हाणमंत गोपाळ वाघमारे यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०२ ते ०४ हे मुले आहेत. अर्जदार क्रमांक ०५ हया आई आहेत. मयत हाणमंत गोपाळ वाघमारे यांचा मृत्यू दिनांक १८.०२.२०१६ रोजी झाला. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ यांना मयत हाणमंत गोपाळ वाघमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक — दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली
सहा. अधिक्षक — दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली

Change In Name

My OLD NAME IS KOTGYLE FEROJ ESAMODDIN HANEGAON TQ. DEGLOOR DIST. NANDED. HAVE CHANGED MY NEW NAME: FEROZ ISAMODDIN KOTGYLE AT. POST HANEGAON TQ. DEGLOOR DIST. NANDED. effectively for the future communication please address me with my new.

Sign by.. FEROZ ISMODDIN KOTGYLE

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

कुटुंबाची जबाबदारी सांभाळून महिलांनी सक्षम होण्यावर भर द्यावा -डॉ. गर्विता सिंह

महिला दिनानिमित्त पोलीस वसाहतीत स्नेहमेळावा उत्साहात

नांदेड (प्रतिनिधी) –आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळून महिलांनी सर्व आघाड्यांवर सक्षम होण्यावर भर देऊन स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन डॉ. गर्विता सिंह यांनी केले. स्नेहनगर पोलीस वसाहत येथे आयोजित स्नेहमेळाव्यात मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या सुविद्य पत्नी डॉ. गर्वितासिंह यांनी उपस्थित महिलांचा सन्मान केला.

जागतिक महिला दिनानिमित्त येथील पोलीस लॉन्समध्ये रविवार, दि. ८ मार्च रोजी सायंकाळी खास महिलांसाठी स्नेहमेळावा घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गर्वितासिंह अबिनाश कुमार, संस्कृती सुरज गुरव, अति. पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपाधीक्षक अश्विनी जगताप, मैथिली रामेश्वर व्यंजने यांच्यासह इतरांची उपस्थिती होती. स्नेहमेळाव्याच्या उद्घाटनानंतर मान्यवर पाहुण्यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

महिलांनी आपले कुटुंब सांभाळतांना आपले आरोग्यही सांभाळावे. मुलांना घडविण्यासाठी शिक्षणावर भर द्यावा. मुलांसह आपले काही छंद असतील, शिक्षण असेल ते पूर्ण करावे. या सर्व घडामोडींसह काळानुरूप स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन करण्यात आले. यानंतर कलागुण सादर करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.

या स्नेहमेळाव्यात महिला पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

महिला दिनानिमित्त आयोजित या स्नेह मेळाव्यात गायिका मेघा गायकवाड यांच्या स्वरमेघ ग्रुपच्या वतीने विविध गीतं सादर करण्यात आली. यावेळी पोलीस दलातील महिलांसह त्यांच्या कुटुंबातील महिलांनी विविध प्रकारची आणि विविध वेशभूषेतील जोरदार नृत्याविष्कारही सादर केले. याचबरोबर पोलीस कुटुंबातील मुली-महिलांनी फॅशन शो सादर केला. याचबरोबर विविध स्पर्धांचेही यावेळी आयोजन करण्यात आले होते. नृत्य, कला, फॅशन शो अशा विविध स्पर्धांमधील विजेत्यांना यावेळी बक्षीसही देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका गायकवाड आणि मेघा गायकवाड यांनी केले.

शेलगाव येथे आत्माराम महाराज यात्रा महोत्सव

अर्धापूर (प्रतिनिधी)– तालुक्यातील शेलगाव (बु.खु.) येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आत्माराम महाराज संस्थानच्या वतीने यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारपासून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली आहे.

यात्रेनिमित्त दररोज सकाळी श्रींची पूजा व अभिषेक पार पडणार असून, सायंकाळी हरिपाठ व गोंधळ कथेचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे स्थानिक कलाकारांनी सादर केलेली नाटके शुक्रवार, दि. १३ मार्च रात्री ८ वाजता पालखी मिरवणूक निघेल, त्यानंतर रात्री ९ वाजता हनमंत लावंड पाटील लिखित 'डाव प्रति डाव' हे सामाजिक विनोदी नाटक सादर होईल.

शनिवार, दि. १४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता भगवान महाराज यांचे कीर्तन, दुपारी १२ वाजता दत्त जन्म व महाप्रसाद वाटप होईल. दिग्दर्शक नरेश पुयड असून रात्री ९ वाजता 'सुडाचा विडा रक्तात रंगला चुडा' हे नाटक सादर केले जाईल. शनिवारी दुपारी १ ते ५ भव्य कुस्त्या होणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पैलवानांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. कुस्तीचे नियोजन पैलवान हरी एकनाथ राजेगोरे व संतोष सटवाजी राजेगोरे करत आहेत.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सावता परिषदेच्यावतीने अभिवादन

नांदेड (प्रतिनिधी)– येथील सावता परिषद जिल्हा शाखेच्यावतीने मंगळवार, दि. १० मार्च रोजी सकाळी ९ वाजता शहराच्या आयटीआय चौक परिसरात असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतीराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सावता परिषद, माळी महासंघ, समता परिषद व पिछडा शोषित संघटनेच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन करण्यात आले.

या अभिवादन कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुणवंत मिसलवाड यांनी केले.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना पुढे ते आपल्या भाषणात म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतींना उजाळा देवून आधुनिक काळात मुलींनी शिकले पाहिजे, असे सांगून भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या महान कार्याची दखल घेवून त्यांना मरणोपरांत भारतरत्न पुरस्कार देण्याचीही मागणी त्यांनी यावेळी सावता परिषदेच्यावतीने केंद्र सरकारकडे केली.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून रामचंद्र रासे, ओबीसीचे सटवा माच्चेवाड, बालाजी थोटवे, सावता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष गोरख राऊत, सावता परिषदेचे नांदेड जिल्हाध्यक्ष सुनिल शिंदे, पिछडा शोषित संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष सतीशचंद्र शिंदे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

'स्वारातीम' विद्यापीठाच्या वार्षिक अर्थसंकल्पास अधिसभेची मंजुरी

▸ रूपये ४२ कोटी १८ लक्ष तुटीचा अर्थसंकल्प सादर

नांदेड (प्रतिनिधी)– येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा वार्षिक अर्थसंकल्प अधिसभेच्या बैठकीत एकमताने दुरुस्तीसह मंजूर करण्यात आला. अधिसभा सदस्य अशोक गुजराथी यांनी एकूण रुपये ३१४ कोटींचा अर्थसंकल्प ९ मार्च रोजी विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये सादर केला आहे. ४२ कोटी १८ लाख रुपयांच्या या तुटीचा अर्थसंकल्पास काही दुरुस्तीसह अधिसभेने मंजूर केला आहे.

कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. माधव गव्हाणे, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. संतराम मुंढे, नरेंद्र चव्हाण, नारायण चौधरी, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, उपकेंद्राचे संचालक डॉ. संभाजी माने, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, आजीवन शिक्षण आणि विस्तार मंडळाचे संचालक डॉ. वैजनाथ अनमुलवाड यासह अधिसभा सदस्य डॉ.दीपक बच्चेवार, डॉ. अशोक गवते, डॉ.दिलीप मुगळे, डॉ. संजय वाघमारे, डॉ.आशा मुंडे, धनराज जोशी, रामेश्वर पवार, डॉ. ए. टी. शिंदे, डॉ.विजय भोपाळे, डॉ.विष्णू पवार, डॉ. दिलीप पाईकराव, डॉ.अशोक टिपरसे, डॉ. एम. ए. बेंबडे, डॉ.वर्षा डोडीया, डॉ. बाबासाहेब सुरवसे, डॉ. दिलीपकुमार बोईनवाड, डॉ. शालिनी कदम, युवराज पाटील, डॉ. महेश मगर, अजय गायकवाड, गजानन आसोलेकर, शितल सोनटक्के, राजगोपाल कलानी, सिद्धेश्वर कासनाळे, दीपक मोरताळे, प्रमोद देशमुख, डॉ.सुभाष विखे, शिवाजी चांदणे आणि रंगनाथ शेळके आदींची मोठ्यासंख्येने उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांचे सर्वांगीण कल्याण, कौशल्य विकास, संशोधनाला चालना आणि पायाभूत सुविधा विकास या प्रमुख बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच विद्यापीठ परिसराच्या आधुनिकीकरणासाठी विविध योजनांसाठी अर्थसंकल्पात महत्त्वपूर्ण आर्थिक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

विमान अपघात प्रकरणी रास्ता रोको करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात

नांदेड (प्रतिनिधी)– राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेच्या निष्पक्ष चौकशीच्या मागणीसाठी मंगळवार दि. १० मार्च रोजी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व अजितदादा समर्थक प्रवीण घुले यांनी केले. मात्र वजिराबाद पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत आंदोलन सुरू करण्यापूर्वीच आंदोलकांना ताब्यात घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुरू झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान काही काळ वाहतूक ठप्प झाली. आंदोलन करताना आंदोलन करण्यापूर्वीच पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी हस्तक्षेप करत ताब्यात घेतले आणि वजिराबाद पोलीस ठाण्यात हजर केले.

या आंदोलनात अमोल मालेगावकर, बाबू धबाले, नितीन म्हस्के, सचिन पोपलवाड, अर्चना घुले, रेखा धबाले, जयवंताबाई घुले, वैजंताबाई निखाते, सोनीताई गायकवाड, आशाबाई धबाले, नितीन हटकर, अमोल भरणे, साहेबराव लोकडे, राजू कोकरे, अमोल कपाळे, बिलाबाई लांडगे, शिवाजी टेकवाड, विजय जोंधळे यांच्यासह शेकडो अजितदादा समर्थक उपस्थित होते.

तामसा पोलिसांची जुगार अड्ड्यावर कारवाई; साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तामसा तांडा शिवारात सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी कारवाई केली. यावेळी जुगार अड्ड्यावरून नऊ दुचाकी, तेरा हजार रुपये रोख जप्त करून एकाला अटक केली. नऊ जण मात्र पोलीस दिसताच पळून गेले.

हदगाव तालुक्यातील तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत तामसा तांडा शिवारात जुगार अड्डा सुरू असल्याची माहिती तामसा ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कळविले. त्यावरून खेडकर यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना पाठवून त्या ठिकाणी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. दि. ९ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास पोलिसांनी कारवाई करून संजय तुकाराम धुमाळे (वय ४५ राहणार हदगाव) याला अटक केली. पोलीस दिसताच घटनास्थळावरून मात्र नऊ जण पसार झाले. पोलिसांनी जुगार अड्ड्यावरून नऊ दुचाकी आणि रोख तेरा हजार २४० असा पाच लाख ६३ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी तामसा पोलीस ठाण्यात दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जमिनीच्या वादातून एकावर जीवघेणा हल्ला

नांदेड (प्रतिनिधी) –जमीन खरेदी- विक्री व्यवहारातून एकावर कुऱ्हाडीने आणि लोखंडी रॉडने जबर हल्ला करून खून करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना सात जानेवारी रोजी दुपारी पावणेतीनच्या सुमारास बोरगाव (आ) येथे घडली.

लोहा तालुक्यातील बोरगाव (आ) येथील शेतकरी पुंडलिकराव हरजी पाटील (वय ६६) यांना त्याच गावातील विठ्ठल नारायण पाटील (वय ३२), नारायण व्यंकटी पाटील (वय ६२), राहुल शेषराव पाटील (वय ३४) आणि साहेब बाबाराव पाटील (वय ४५) यांनी संगणमत करून पुंडलिकराव पाटील यांना रस्त्यात अडवून जमीन खरेदी-विक्रीच्या कारणावरून जबर मारहाण केली. या मारहाणीत कुऱ्हाड, लोखंडी रॉडचा वापर करण्यात आला. जबर मारहाण करून खून करण्याचा प्रयत्न केला. पुंडलिकराव हरजी पाटील यांच्या फिर्यादीवरून लोहा पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जबरी चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना अटक; दुचाकीसह घातक शस्त्र जप्त, इतवारा गुन्हे शोध पथकाची कारवाई

नांदेड (प्रतिनिधी) –शहराच्या इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर चव्हाण यांनी अटक केली. चोरट्यांकडून नगदी एकोणवीस हजार रुपये, एक दुचाकी आणि तलवार, खंजर असे घातक शस्त्र जप्त केले आहेत.

शहराच्या इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फिर्यादी पामुला देवराजू चंद्रया गौड़ (वय ४७ वर्ष, व्यवसाय- खाजगी नौकरी, रा.नारायणपुर करीमनगर बेल्लारेड्डीपेठ आंध्रप्रदेश ह. मु. अबचलनगर नांदेड) यांनी इतवारा ठाण्यात येवुन फिर्याद दिली की, दि. ९ मार्च रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास केळी मार्केट इतवारा नांदेड येथे आमच्या ताडीचे दुकानात असतांना दोन अनोळखी व्यक्तींनी आमचे दुकानात शिरून आम्हाला पिस्टलसारखे हत्यार व खंजर दाखवून, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवुन दुकानाच्या गल्ल्यातील नगदी १९ हजार रुपये जबरीने काढून नेले. या फिर्यादीवरून इतवारा ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांनी गुन्हा दाखल करून घेतला.

सदर गुन्ह्याच्या तपासात खनाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन इतवारा गुन्हे शोध पथकाचे पोउपनि परमेश्वर चव्हाण व गुन्हे शोध पथकातील अंमलदार यांनी तपास करून गोपनीय माहितीच्या आधारे काही तासाचे आत राजसिंघ सुंदरसिंघ सिरपल्लीवाले (वय-२० वर्षे व्यवसाय- खाजगी नौकरी रा. गुरुद्वारा गेट क्रमाक ५ शहिदपुरा/बडपुरा नांदेड) आणि अंगतसिंघ सुरजीतसिंघ भुमन (वय १८ वर्षे व्यवसाय-खाजगी नौकरी रा. गुरुव्वारा गेट क्र.०४ बडपुरा/ शहिदपुरा नांदेड) यांना ताब्यात घेवून त्यांची चौकशी करून वरील जबरी चोरीच्या गुन्ह्याची उकल करून गुन्ह्यातील गेलेला माल १९ हजार रूपये व गुन्ह्यात वापरलेले हत्यार, वाहन (दुचाकी) जप्त केले आहे.

शाहाबाद मारकंडा व मोहरी स्थानकांवरील कामांमुळे काही गाड्यांच्या मार्गांत बदल

नांदेड (प्रतिनिधी) –उत्तर रेल्वेच्या दिल्ली विभागातील शाहाबाद मारकंडा व मोहरी स्थानकांवर पॉवर व ट्रॅफिक ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कामांमुळे काही गाड्यांच्या मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

हे ब्लॉक ३० मे २०२६ ते ०६ जून २०२६ रोजी घेतले जाणार आहेत. या कामामुळे खालील गाड्यांचे मार्गांतर करण्यात येईल: गाडीसंख्या १२७५१ हु.सा.नांदेड-जम्मू तावी हमसफर एक्सप्रेस दि.०५.०६.२०२६ नवी दिल्ली, शकूर बस्ती, जाखल जंक्शन, धूरी जंक्शन अम्बाला कैंट, राजपुरा , पटियाला व गाडीसंख्या १२७१५ हु.सा.नांदेड-अमृतसर सचखंड एक्सप्रेस दि. ०५.०६.२०२६ हज़रत निज़ामुद्दीन, तिलक ब्रिज, गाजियाबाद, सहारनपुर, अम्बाला कैंट नवी दिल्ली, पानिपत, करनाल, कुरुक्षेत्र होणार आहे.

किनवट नगर परिषदेच्या गाळ्यांतील 'पोटभाडेकरूंचा' बाजार उठणार

गाळ्यांचे सर्वेक्षण होणार

किनवट (प्रतिनिधी)– येथील नगर परिषदेच्या मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळ्यांचा वापर नियम धाब्यावर बसवून केला जात असल्याच्या तक्रारी होत आहेत. अनेक मूळ भाडेधारकांनी नगर परिषदेकडून कवडीमोल दरात भाड्याने घेतलेले गाळे अव्वाच्या सव्वा किमतीत 'पोटभाडेकरूंना' दिले आहेत. या अनधिकृत व्यवहारांमुळे नगर परिषदेचा महसूल बुडत असल्याने सर्वच गाळ्यांचे सर्वेक्षण करून अनधिकृत वापरावर कठोर निर्बंध घालणार असल्याची माहिती पालिकेचे बांधकाम सभापती राम नेम्मानीवार यांनी दिली आहे.

नगर परिषदेकडून शहरातील सुशिक्षित बेरोजगारांना आणि छोट्याव्यापाऱ्यांनाव्यवसायासाठी अल्पदरात गाळे उपलब्ध करून देण्यात आले. मात्र, अनेक 'बड्या' भाडेधारकांनी हे गाळे स्वतः न चालवता दुसऱ्यांना पोटभाड्याने दिले आहेत. नगर परिषदेच्या करारात पोटभाडेकरू ठेवण्यास सक्त मनाई असताना नगर परिषदेच्या सर्वच व्यापारी संकुलातील मूळ मालकांनी मागील कित्येक वर्षांपासून भाडे कराराच्या अटी व शर्तींना धाब्यावर बसवून पोटभाडेकरू ठेवले आहेत. या पोटभाडेकरूंकडून गाळ्याचा गैरवापर होत आहे. काही महाभागांनी या शासकीय मालमत्तेत अवैध व्यवसाय सुरु केले असून, मटका, जुगार, लॉटरी, देशी दारू यासह परवाना नसलेले व्यवसाय राजरोसपणे सुरू आहेत. तर काहींनी गाळ्यांची परस्पर लाखो रुपयांत विक्री केली आहे. यासंदर्भात नागरिकांकडून सातत्याने तक्रारी केल्या जात असतानाही नगरपालिका प्रशासनाकडून त्याची दखल घेतली जात नव्हती. अनेक गाळ्यांचा वापर ज्या कारणासाठी घेतला होता, त्याऐवजी दुसऱ्याच कामासाठी केला जात असून बांधकाम सभापती राम नेम्मानीवार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. लवकरच अशा गाळ्यांचे सर्वेक्षण करून प्रत्यक्ष जागेवर तपासणी केली जाणार आहे.

गाळ्यात बसलेली व्यक्ती मूळभाडेधारक आहे की, पोटभाडेकरू याची पडताळणी करण्यात येईल. तसेच अटीं- शर्तीचा भंग करणाऱ्या भाडेधारकांना तत्काळ नोटिसा पाठवल्या जातील आणि नियमांचे उल्लंघन सिद्ध झाल्यास संबंधित मूळ मालकाचे वाटप रद्द करून गाळा पुन्हा नगर परिषदेच्या ताब्यात घेण्याची कारवाई केली जाणार आहे. नगर परिषदेच्या मालमत्तेचा गैरवापर खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट करत नियमांचे उल्लंघन करून पोटभाडेकरू ठेवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत राम नेम्मानीवार यांनी दिले आहेत.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com